# ग्रामीण भागातील कर्करोग रुग्णांना दिलासा द्या

## संसदेत लंके यांची ठाम मागणी

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

देशातील कर्करोग उपचार सुविधांतील तफावत दूर करून ग्रामीण भागातील रुग्णांना त्यांच्या जिल्ह्यात व तालुका स्तरावरच उपचार उपलब्ध व्हावेत, यासाठी खासदार नीलेश लंके यांनी शुक्रवारी लोकसभेत प्रश्न उपस्थित केला. राष्ट्रीय कर्करोग काळजी धोरणासंदर्भात तारांकित प्रश्न क्रमांक ३०१ अंतर्गत त्यांनी केंद्र सरकारकडे सविस्तर माहिती मागितली.

केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री जगत प्रकाश नड्डा यांनी या प्रश्नाचे उत्तर सभागृहात दिले. देशातील अनेक जिल्ह्यांमध्ये अद्याप व्यापक कर्करोग उपचार सुविधा उपलब्ध नसल्याची बाब लंके यांनी यावेळी अधोरेखित केली. केवळ सुमारे ३० टक्के जिल्ह्यांमध्येच कर्करोग उपचार केंद्रे उपलब्ध असल्यामुळे लाखो रुग्णांना उपचारांसाठी मोठ्या शहरांकडे जावे लागते, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

पूरक प्रश्न उपस्थित करताना लंके यांनी महाराष्ट्रातील भौगोलिकदृष्ट्या सर्वात मोठा जिल्हा असलेल्या अहिल्यानगरमधील परिस्थिती सभागृहासमोर मांडली. जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रुग्णांना साध्या कीमोथेरपीसाठीसुद्धा मुंबई किंवा पुणे येथे जावे लागते, ज्यामुळे त्यांच्यावर आर्थिक तसेच मानसिक ताण वाढतो, असे त्यांनी सांगितले.

केंद्र सरकारने अर्थसंकल्प २०२५-२६ मध्ये प्रत्येक जिल्ह्यात 'डे-केअर कॅन्सर सेंटर' सुरू करण्याची घोषणा केली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा रुग्णालयाला मुख्य उपचार केंद्र मानून सर्व तालुका रुग्णालयांना त्याची संलग्न उपकेंद्रे म्हणून विकसित करून तेथे डे-केअर कॅन्सर सेंटर सुरू करण्याची कालबद्ध योजना सरकारकडे आहे का, अशी विचारणा त्यांनी केली.

या पद्धतीने कर्करोगाचे निदान जिल्हा रुग्णालयात होऊन कीमोथेरपीसारखे उपचार रुग्णांना त्यांच्या तालुक्यातच मिळू शकतील, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच राष्ट्रीय निःशुल्क औषध उपक्रमांतर्गत कीमोथेरपीसाठी लागणारी महागडी औषधे व तज्ज्ञ डॉक्टर तालुका स्तरावर उपलब्ध करून देण्याची मागणीही त्यांनी केली. याशिवाय कर्करोग उपचारांचा वाढता खर्च लक्षात घेता आयुष्मान भारत योजनेची सध्याची पाच लाख रुपयांची मर्यादा वाढवण्याचा किंवा 'आरोग्य मंत्री कर्करोग रुग्ण निधी'च्या माध्यमातून अतिरिक्त आर्थिक संरक्षण देण्याचा सरकारचा विचार आहे का, असा सवाल लंके यांनी केला. ग्रामीण भागातील रुग्णांना आर्थिक मदत मिळवण्यासाठीची प्रक्रिया सुलभ करून 'डिजिटल सिंगल विंडो' प्रणालीद्वारे ती राबवण्याचीही मागणी त्यांनी केली.

ग्रामीण भागातील गरीब कुटुंबांवर उपचारासाठी शेती किंवा मालमत्ता विकण्याची वेळ येऊ नये, यासाठी कर्करोग उपचारांसाठी मजबूत आरोग्य आणि आर्थिक सुरक्षा यंत्रणा उभारण्याची गरज असल्याचे लंके यांनी यावेळी अधोरेखित केले.




### गॅस टंचाईकडे वेधले लक्ष

मध्यपूर्वेतील युध्दामुळे एलपीजी गॅसची आयात प्रभावित झाली असून त्यामुळे देशामध्ये निर्माण झालेल्या गॅसच्या टंचाईच्या पार्श्वभूमीवर खासदार नीलेश लंके व खासदार भास्कर भगरे यांनी संसदेच्या पाय-यांवर गॅसचे प्रतिकात्मक सिलेंडर घेउन धरणे आंदोलन करत सरकारचे लक्ष वेधले.

# १५ तंबाखू विक्रेत्यांवर दंडात्मक कार्यवाही



**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

बिलोली शहरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांची मोठ्या प्रमाणात विक्री तसेच कोटपा २००३ कायद्याचे उल्लंघन होत असल्याबाबत मिळालेल्या माहितीनुसार जिल्हास्तरीय तंबाखू नियंत्रण पथकाने १२ मार्च रोजी बिलोली शहरात विविध ठिकाणी अचानक धाडी टाकून एकूण १५ तंबाखू विक्रेत्यांवर दंडात्मक कार्यवाही करून ६ हजार ४०० रुपये दंड वसूल केला.

ही कार्यवाही जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या निर्देशाने जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय पेरके, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पांडुरंग पावडे व नोडल अधिकारी डॉ. हनमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या पथकात जिल्हा सल्लागार डॉ. शितल चातुरे, डॉ.संजीवनी जाधव, डेंटल सर्जन डॉ. पूजा काळे, मानसशास्त्रज्ञ प्रकाश आहेर, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ते बालाजी गायकवाड व समुपदेशक सुंदर चव्हाण तसेच बिलोली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल एम एस मुद्देमवार व पोलीस कॉन्स्टेबल एन एम अंबुरे उपस्थित होते. सार्वजनिक ठिकाणी तसेच शैक्षणिक अथवा शासकीय, निमशासकीय कार्यालयाच्या परिसरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांची विक्री अथवा सेवन किंवा साठवण होत असल्यास जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्ष, जिल्हा रुग्णालय नांदेड येथे तक्रार नोंदवून नांदेड जिल्हा तंबाखू मुक्त करण्याच्या या अभियानास सहकार्य करावे असे, आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके यांनी केले आहे.

## द्रोण लगडचे उल्लेखनीय यश

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

व्यंकनाथ विद्यालयाचा माजी विद्यार्थी द्रोण पुरुषोत्तम लगड याने देशातील प्रतिष्ठित अभियांत्रिकी प्रवेश परीक्षा असलेल्या जेईई (JEE) मेन्स परीक्षेत ९८.६६ टक्के गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या यशाबद्दल विद्यालयाच्या वतीने त्याचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना द्रोण लगड याने सांगितले की, विद्यालयातील सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन आणि आशीर्वाद यामुळेच हे यश मिळवणे शक्य झाले. विद्यालयात शिकत असतानाच मूलभूत संकल्पना स्पष्टपणे समजावून दिल्यामुळे परीक्षेची तयारी सोपी झाली, असेही त्याने नमूद केले. द्रोणचे वडील पुरुषोत्तम लगड हे देखील विद्यालयाच्या स्कूल कमिटीमध्ये कार्यरत असून विद्यार्थी हिताच्या दृष्टीने सातत्याने कार्य करत असतात.

# सफाई कर्मचाऱ्यांना योजनांचा लाभ वेळेत द्या : शेरसिंग रुक्कानसिंग डागोर

- आरोग्य, निवास, शिक्षण यांच्यासह सर्व लाभ वेळेत देण्यासाठी योजनांची अंमलबजावणी करा

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**




स्वच्छतेच्या माध्यमातून समाजात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूलभूत हक्कांसह शासनाच्या विविध योजनांचा लाभ वेळेवर मिळणे गरजेचे आहे. शासन निर्णयानुसार सफाई कर्मचाऱ्यांना तसेच त्यांच्या कुटुंबियांच्या प्रगतीसाठी विविध योजनांचे लाभ नियमानुसार व वेळेत देण्याची कार्यवाही करावी, असे निर्देश राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग रुक्कानसिंग डागोर यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठक कक्षात सफाई कामगारांच्या अडचणी व प्रश्नांबाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, मनपाचे अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, नगर पालिका प्रशासनाचे सहआयुक्त गंगाधर इरलोड, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके, समाज कल्याण अधिकारी सतेंद्र आऊलवार, सर्व नगरपालिकांचे मुख्याधिकारी, विभागप्रमुख तसेच सफाई कर्मचारी संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीत लाड-पागे समितीच्या शिफारशींनुसार सफाई कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीबाबत चर्चा करण्यात आली. हदगाव नगर परिषदेअंतर्गत प्रलंबित प्रकरणावर येत्या आठ दिवसांत कार्यवाही करून अहवाल सादर करा. तसेच समितीनुसार असलेली सर्व प्रलंबित प्रकरणे तात्काळ निकाली काढण्याच्या सूचना अध्यक्ष डागोर यांनी दिल्या. सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने विशेष शिबिरे आयोजित करून आयुष्मान भारत कार्ड व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेचा लाभ देण्याचे निर्देश त्यांनी दिले. तसेच श्रमसाफल्य आवास योजनेअंतर्गत घरकुल, समाजकल्याण विभागाच्या योजनांद्वारे पाल्यांना शैक्षणिक शिष्यवृत्ती, तसेच महात्मा फुले मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळामार्फत उद्योगासाठी कर्ज वेळेत उपलब्ध करून देण्याबाबतही त्यांनी सूचना केल्या. याशिवाय सफाई कर्मचाऱ्यांना शैक्षणिक पात्रतेनुसार पदोन्नती, साप्ताहिक सुटी, नियमित वेतन तसेच निवृत्त कर्मचाऱ्यांना प्रलंबित लाभ तातडीने देण्याची कार्यवाही करावी, असेही त्यांनी सांगितले. माध्यमांशी बोलताना अध्यक्ष डागोर यांनी सांगितले की, भविष्यात सफाई कर्मचारी कंत्राटी न राहता नियमित कर्मचारी करण्यावर भर देणार असल्याचे त्यानी सांगितले. निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांनी प्रशासन सफाई कर्मचाऱ्यांच्या हितासाठी समन्वयाने कार्य करून त्यांचे प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावेल, अशी ग्वाही दिली. प्रारंभी नगर पालिका प्रशासनाचे सहआयुक्त गंगाधर इरलोड यांनी सादरीकरणाद्वारे विविध बाबींची माहिती दिली.

# ग्राहक दिन २०२६ : एअरटेल आपली ग्राहकहिताच्या ध्यासाची संस्कृती अधिक बळकट करत आहे

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



एअरटेल यांनी आज आपली ग्राहक दिन 2026, ही संस्थेमधील एक व्यापक मोहीम चिन्हित केली जी ग्राहकांच्या समस्या समजून घेणे आणि सातत्याने आपल्या वितरण अनुभवात सुधारणा करण्यावर केंद्रित आहे. नेतृत्व टीमपासून ते कार्यविषयक तज्ज्ञांपर्यंत जवळपास सुमारे वीस हजार एअरटेल कर्मचारी त्यांच्या कार्यालयांमधून बाहेर आले आणि क्षेत्रामध्ये आघाडीच्या टीमसह काम करून ग्राहकांसह थेट संपर्क साधण्यासाठी, क्षेत्र अभियंत्यांसोबत घरे आणि दुकानांना भेटी देऊन, आणि रिटेल तसेच सेवा केंद्रांसह परस्पर संवाद साधून सर्वात महत्वाच्या समस्यांविषयी प्रत्यक्ष जाणून घेण्यासाठी कार्यरत झाले. एअरटेल मधील ग्राहक दिन म्हणजे संस्थेसाठी आत्मपरीक्षण करण्यासाठी आणि स्वतःला एक साधा परंतु अत्यंत महत्वाचा प्रश्न विचारण्यासाठी एक हेतुपुरस्सर घेतलेला विराम ठरतो: आपण आपल्या ग्राहकांसाठी अधिक काय करू शकतो?

उपक्रमावर टिप्पणी करताना, शाश्वत शर्मा, व्यवस्थापकीय संचालक आणि CEO, एअरटेल इंडिया, म्हणाले: "ग्राहक दिन हा आम्हाला ग्राहकांचे म्हणणे सखोलतेने ऐकून घेण्याच्या, स्वतःला आव्हान देण्याच्या आणि तत्परतेने कृती करण्याच्या आमच्या जबाबदारीची महत्वाची आठवण करून देतो. हा दिन ग्राहकांच्या समस्या सोडविणे, ग्राहक अनुभव सुलभ बनवणे आणि आमच्या लाखो ग्राहकांना दररोज वितरित केल्या जाणाऱ्या सेवेचा दर्जा सातत्याने उंचावण्यासाठी आमची वचनबद्धता अधिक बळकट करतो."

ग्राहकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी असलेली ही पद्धत आणि संस्कृती एअरटेलच्या अनेक ग्राहक-केंद्रित नवोपक्रमांमध्ये केंद्रस्थानी राहिली आहे. अधिक मजबूत केलेल्या स्पाम आणि फ्रॉड संरक्षणापासून ते एअरटेल ॲप आणि नवीन-युगाच्या AI-सक्षम साधनांमध्ये अधिक विस्तृत प्रवेशासह अधिक सोप्या, अधिक उत्स्फुर्त डिजिटल प्रवासांद्वारे एअरटेलच्या उपायांना श्रवणाद्वारे आकार मिळाला आहे.

ग्राहक दिन एअरटेलचा हा विश्वास देखील मजबूत करतो की अनुभवात सुधारणा ही नैमित्तिक नाही तर निरंतर असते. ग्राहकांचे म्हणणे लक्षपूर्वक ऐकून घेऊन आणि त्यांच्या प्रतिक्रियांवर निर्णायकपणे कृती करून, कंपनी प्रक्रिया सुलभ करणे, अडथळे दूर करणे आणि विश्वासार्ह, उत्स्फुर्त आणि प्रतिसादक्षम सेवांची रचना करण्याचे कार्य सातत्याने सुरू ठेवत आहे. हा दिन एअरटेलला एकाच, चिरस्थायी उद्देशामागे एकजूट करतो: अशी कंपनी बनणे जेथे ग्राहकहिताचा ध्यास हे केवळ घोषवाक्य नाही, तर संस्कृती आहे -- अशी संस्कृती जी निरंतर सुधारणेला चालना देते आणि प्रत्येक निर्णयाची सुरवात आणि शेवट ग्राहकापासूनच होईल याची खात्री करते.

# कुरकुंभ औद्योगिक वसाहतीत कामगार सुरक्षिततेसाठी जनजागृती कार्यक्रम



**कुरकुंभ : (समर्थ गांवकरी)**

राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहाच्या निमित्ताने हेन्केल इंडिया या उद्योगसमूहाने कुरकुंभ औद्योगिक वसाहतीत कामाच्या ठिकाणी सुरक्षितता आणि कामगार संहितेबाबत जनजागृती करण्यासाठी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय (डीआयएसएच) यांच्यासोबत संयुक्त उपक्रम आयोजित केला. या कार्यक्रमास संचालनालयाचे सहसंचालक सुधीर शिंदे, उपसंचालक प्रविण पाटील तसेच कुरकुंभ औद्योगिक वसाहतीतील विविध उद्योगांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यंदाच्या राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहाची संकल्पना 'सहभाग, शिक्षण आणि सक्षमीकरण' अशी असून कामाच्या ठिकाणी जागरूकता, प्रशिक्षण आणि सामूहिक जबाबदारीच्या माध्यमातून सुरक्षिततेची संस्कृती अधिक मजबूत करण्यावर या कार्यक्रमात भर देण्यात आला.

या चर्चासत्रादरम्यान कुरकुंभ औद्योगिक वसाहतीतील उद्योगांनी परस्पर सहकार्य वाढवणे, चांगल्या कामकाज पद्धतींची देवाणघेवाण करणे तसेच व्यावसायिक आरोग्य, कामगार सुरक्षा आणि प्रक्रिया सुरक्षितता यांसारख्या क्षेत्रांमध्ये एकमेकांकडून शिकण्याची गरज अधोरेखित करण्यात आली.

यावेळी बोलताना सहसंचालक सुधीर शिंदे म्हणाले, "अशा प्रकारच्या संयुक्त उपक्रमांमुळे जागरूकता वाढते, नियमांचे पालन अधिक प्रभावीपणे होते आणि संपूर्ण औद्योगिक क्षेत्रात सुरक्षित कामाचे वातावरण निर्माण करण्याची बांधिलकी अधिक बळकट होते."

हेन्केल कुरकुंभचे प्रकल्प संचालक बालाजी गोपालस्वामी म्हणाले, "सहभाग, शिक्षण आणि सक्षमीकरण ही संकल्पना आमच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनाशी सुसंगत आहे. सातत्यपूर्ण संवाद आणि अनुभवांची देवाणघेवाण यामुळे उद्योगांमध्ये सुरक्षिततेची संस्कृती अधिक मजबूत होते. अशा व्यासपीठामुळे कुरकुंभ औद्योगिक वसाहतीतील कंपन्यांना व्यावसायिक आरोग्य व सुरक्षिततेबाबतचे अनुभव एकमेकांसोबत शेअर करण्याची संधी मिळते."

या उपक्रमात केंद्र शासनाने लागू केलेल्या नवीन कामगार संहितेबाबत, विशेषतः व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कामाच्या अटी संहिता याबाबत जागरूकता निर्माण करण्यावर भर देण्यात आला. कामगार सांख्यिकी विभागाच्या आकडेवारीनुसार भारतात ५० कोटींहून अधिक कामगार कार्यरत आहेत.

**महाराष्ट्र शासन**
सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अकोले, ता. अकोले जि. अहिल्यानगर यांचे कार्यालय
जा.क्र. पतसंस्था कलम १००/८५/सुनावणी /नोटीस / २०२५ दि.

**संतुजी आनंदा धुमाळ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, अकोले ता. अकोले, जि. अहिल्यानगर या संस्थेच्या थकीत कर्जदार, जामिनदार व मिळकतदार यांचे साठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०० व १९६१ चे नियम ८५ अन्वये**
**जाहीर नोटीस**

खालील कर्जदार व मिळकतदार यांना कळविण्यात येते की, आपलेकडील थकबाकीची रक्कम व होणारे व्याज आणि इतर अनुषंगीक खर्च यासह होणारी सर्व रक्कम थकीत रकमेचा संस्थेचा भरणा करणेबाबत व भरणा न केल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६० चे कलम १९६१ चे नियम ८५ अन्वये आपले कर्जासाठी तारण / गहाण असलेली मालमत्ता संस्थेच्या नावे हस्तांतरीत करण्यात येईल अशी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था अकोले, जि. अहिल्यानगर यांचे कार्यालयाची दिनांक २५/०२/०२६ रोजीची नोटीस देण्यात आलेली होती.

तथापि, अद्याप पोवेतो कोणत्याही थकीत कर्जाचा भरणा संस्थेत झालेला नसल्याने ही नोटीस प्रसिध्द झाल्याचे दिनांकापासून पुढील १५ दिवसांचे आत संपुर्ण थकीत रकमेचा भरणा संस्थेत करण्यात यावा व तसे या कार्यालयास कळवावे. आपले या संबधी काही लेखी म्हणणे / आक्षेप / हरकत असल्यास दि. २८/३/२०२६ रोजी दुपारी २.३० वा. सहाय्यक निबधंक, सहकारी संस्था, अकोले, ता. अकोले, जि. अहिल्यानगर या कार्यालयात उपस्थित राहून सादर करावेत.

| अ नं | दावा क्र. दिनांक व रक्कम | कर्जदार / मिळकतदार / जामिनदार यांचे नाव | मिळकतीचे वर्णन |
|---|---|---|---|
| १ | दावा क्र. दिनांक व रक्कम ४०२/२०१२ दि. २०/०८/२०१२ दावा रक्कम रु. ११०२३ व दि. ३०/८/१२ पासून द.ा.द.शे १५ % | १) साळु वाळु परते रा. कोहंडी,पो.राजुर, ता.अकोले, जि.अ.नगर (कर्जदार)<br>२) अपर्णा संजय मैड, रा. राजुर, ता.अकोले.जि.अ.नगर (जामिनदार )<br>३) दत्तात्रय जयराम जगदाळे रा.राजुर, ता.अकोले, जि.अ.नगर(जामिनदार) | मौजे कोहंडी ता. अकोले, जि.अ.नगर येथील गट नंबर ११०/१ क्षेत्र ०.०३ आकार ० रु. ११ पैसे |
| २ | दावा क्र. दिनांक व रक्क म ४४३/२०१२ दि. १८/१०/१२ दावा रक्कम रु. १९२०४ व दि. १८/२/१३ पासून द.सा.द.शे. १५ % प्रमाणे व्याज | १) देविदास धोंडू देशमुख रा. राजुर, ता.अकोले.जि.अ.नगर (कर्जदार )<br>२) इस्माईल अहमद मणियार रा. राजुर, ता.अकोले.जि.अ.नगर (जामिनदार )<br>३) चाँद कासम शेख रा. राजुर, ता.अकोले.जि.अ.नगर (जामिनदार ) | रा. राजुर, ता.अकोले. जि.अ.नगर येथील गट नं २०६ क्षेत्र ०.३३ आर आकार ०.०४.५० |
| ३ | दावा क्र. ३७५/२०१६ दावा रक्कम रु. १९९/४० दि. ३१/३/१६ पासून चे व्याज द.सा.द.शे १५ % | १) कैलास यशवंत घोडके रा. उंचखडक, ता.अकोले.जि.अ.नगर (कर्जददार)<br>२) अलका मच्छिंद्र खैरे धुमाळवाडी, ता.अकोले.जि.अ.नगर (जामिनदार)<br>३) प्रभाकर सिताराम फापाळे रा. लिंगदेव, ता.अकोले.जि.अ.नगर (जामिनदार) | मौजे उंचखडक खुर्द, ता.अकोले.जि.अ.नगर येथील गट नं. ३४/५ क्षेत्र ४.०५ आकार ० रु. ८० पैसे |

विहीत मुदतीत थकीत रक्कमेचा भरणा न केल्यास व या संबधाने आपले काही हरकती / म्हणणे / आक्षेप प्राप्त न झाल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०० व १९६१ चे नियम ८५ मधील तरतुदी प्रमाणे त्यांचे नावासमोर दर्शविलेली मालमत्ता संस्थेकडे हस्तांतरीत करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दि. १४/०३/२०२६
सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था अकोले, ता. अकोले, जि. अहिल्यानगर

# मिनी सरस-रेणुका महोत्सवाचे उत्साहात उद्घाटन

## महिलांच्या उत्पादनांना विक्रीचे व्यासपीठ

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नांदेड यांच्या वतीने मिनी सरस – जिल्हास्तरीय रेणुका महोत्सव २०२६ अंतर्गत महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना विक्रीचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी भव्य विक्री व प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचे उद्घाटन उत्साहात पार पडले.

वजीराबाद येथील मल्टीपर्पज हायस्कूल परिसरात आयोजित या प्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा उमेद अभियानाच्या जिल्हा अभियान संचालक मेघना कावली व जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या सौ. पूनमताई राजेश पवार यांच्या हस्ते झाले. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा अभियान सहसंचालक तथा प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा) डॉ. संजय तुबाकले यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी वसरणी येथील निवासी अंध विद्यालयातील विद्यार्थ्यांनी संगीत दिग्दर्शक पंकज शिरभाते यांच्या मार्गदर्शनाखाली स्फूर्तीदायक गीतांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच विनोदी वासरे यांनी केलेल्या बासरी वादनाने कार्यक्रमात रंगत आणली. यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी



(नरेगा) अमित कुमार राठोड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पापु व मयूरकुमार अंदेलवाड, पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. प्रविणकुमार घुले, कार्यकारी अभियंता संजय शिंदे, स्वीय सहाय्यक बालाजी नागमवाड, शुभम तेलेवाड, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मुंडे व त्यांची टीम तसेच आरोग्य विभागाच्या डॉ. प्रगती निलपत्रेवार उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय तुबाकले यांनी केले. कार्यक्रमाची रूपरेषा स्मिता मोहोरी यांनी मांडली तर सूत्रसंचालन इरवंत सूर्यकार व स्मिता मोहोरीर यांनी केले.

उद्घाटनप्रसंगी मनोगत व्यक्त करताना सौ. पूनमताई पवार यांनी महिलांनी तंत्रज्ञानाचा वापर करून अधिकाधिक उद्योग-व्यवसायाकडे वळावे, तसेच त्यांच्या प्रगतीसाठी आवश्यक साधनसामग्री उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे सांगितले. यानंतर राज्य अभियान व्यवस्थापक तथा नांदेडचे पालक अधिकारी रामदास धुमाळ यांनी उमेद अभियानाचा इतिहास, उद्दिष्टे व वैशिष्ट्ये यांची माहिती दिली. महिलांना आर्थिक पाठबळ देऊन उपजीविका, लखपती दीदी उपक्रम तसेच स्वावलंबी विचारपीठ निर्माण करण्याचे काम उमेद अभियानातून होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

# मातोश्री राधा कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये राज्यस्तरीय ADR Reporting and Monitoring स्पर्धा संपन्न

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अंतरभारती रुरल मेडिकल एज्युकेशन ट्रस्टच्या अंतर्गत असलेल्या मातोश्री राधा कॉलेज ऑफ फार्मसी, विरगाव (ता. अकोले) येथे विद्यार्थ्यांमध्ये औषधांच्या सुरक्षित वापराबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने राज्यस्तरीय ADR Reporting and Monitoring स्पर्धेचे आयोजन बुधवार (दि. ११ मार्च २०२६) रोजी करण्यात आले होते. यावेळी अध्यक्ष रावसाहेब वाकचौरे,सेक्रेटरी डॉ. अनिल रहाणे महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. पल्लवी फलके तसेच प्रतिक्षा रहाणे- म्हस्के ,प्रा.विद्याचंद्र सातपुते हे उपस्थित होते. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून सचिन शिंदे (जिल्हा सेक्रेटरी मेडिकल असोसिएशन ऑफ अहिल्यानगर) यांनी काम पाहिले. या स्पर्धेमध्ये पुणे व अहिल्यानगर गटातील विविध



फार्मसी महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी Adverse Drug Reaction (ADR) reporting, औषधांचे दुष्परिणाम ओळखणे, त्यांचे निरीक्षण व नोंदणी प्रणाली याविषयी माहितीपूर्ण सादरीकरण केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये फार्माकोव्हिजिलन्स व रुग्ण सुरक्षिततेबाबत जागरूकता वाढण्यास मदत झाली.

डी. फार्मसी विभागातील निकाल पुढीलप्रमाणे :

प्रथम क्रमांक – साक्षी राऊंधळ व शेख आफसख्तून (VJSM कॉलेज ऑफ फार्मसी, आळे)

द्वितीय क्रमांक – ऋषिकेश शेळके (मातोश्री राधा कॉलेज ऑफ फार्मसी, विरगाव)

तृतीय क्रमांक – प्रतिभा वास्तर व श्रावणी लोखंडे (जय हिंद कॉलेज ऑफ फार्मसी, वडगाव सहानी)

बी. फार्मसी विभागातील निकाल पुढीलप्रमाणे : प्रथम क्रमांक – ओम खैरे व केतकी गोमसे (VJSM कॉलेज ऑफ फार्मसी, आळे) तसेच नाज नादिर व सय्यद शफिया (जय हिंद कॉलेज ऑफ फार्मसी, वडगाव सहानी) द्वितीय क्रमांक – साई बढे व स्नेहा भोर (विशाल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, आळे) तसेच मोहम्मद पठाण व मिधत पठाण (जय हिंद कॉलेज ऑफ फार्मसी, वडगाव सहानी)

तृतीय क्रमांक – वैष्णवी धुमाळ व प्रभावती माधे (मातोश्री राधा कॉलेज ऑफ फार्मसी, विरगाव)

# गॅस सिलेंडर दरवाढीविरोधात काँग्रेसचे तीव्र आंदोलन

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

घरगुती गॅस सिलेंडरच्या दरामध्ये शासनाने केलेल्या मोठ्या वाढीच्या निषेधार्थ श्रीगोंदा काँग्रेस कमिटीच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात आले. वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर गॅस सिलेंडरच्या दरात झालेली वाढ सर्वसामान्य नागरिकांसाठी अन्यायकारक असून शासनाने ही दरवाढ तात्काळ मागे घ्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

गॅस सिलेंडरच्या दरात झालेल्या वाढीमुळे राज्यातील प्रत्येक कुटुंबावर आर्थिक ताण येणार असून याबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. तसेच गॅस सिलेंडर नोंदणीचा कालावधी वाढविण्यात आल्यानेही अनेक नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे त्यांनी नमूद केले.

या पार्श्वभूमीवर शासनाचे



प्रतिनिधी म्हणून प्रांताधिकारी व तहसीलदार यांना श्रीगोंदा काँग्रेस कमिटीच्या वतीने निवेदन देऊन दरवाढ तात्काळ मागे घेण्याची मागणी करण्यात आली.

यावेळी श्रीगोंदा मार्केट कमिटीचे संचालक व महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष प्रशांत भैय्या ओगले, श्रीगोंदा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष संतोष भोयटे, श्रीगोंदा शहर काँग्रेसचे अध्यक्ष ॲड. समित बोरुडे, युवक काँग्रेसचे अध्यक्ष विकास काळे, वडळी गावचे सरपंच महेश दरेकर, माजी युवक अध्यक्ष गोरख बायकर, जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष धनु भाऊ लगड तसेच सोहेल शेख, जितेंद्र पाटोळे, सुरज शेख, बाबासाहेब नलगे, भाऊ गावडे, योगेश शेळके आदी मान्यवर उपस्थित होते.

दरवाढ तात्काळ मागे न घेतल्यास पुढील काळात काँग्रेसच्या वतीने अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही आंदोलनकर्त्यांनी यावेळी दिला.

# केंद्रशासन पुरस्कृत 'उल्लास नव भारत साक्षरता कार्यक्रम'

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

केंद्र शासन पुरस्कृत, 'उल्लास नव भारत साक्षरता कार्यक्रम (ULLAS Nav bharat Saksharata Karyakram)' सन 2022-23 ते सन 2026-27 या कालावधीत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अंमलबजावणी करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. देशातील 15 वर्षे आणि त्याहून अधिक वयोगटातील निरक्षर व्यक्तीमध्ये पायाभूत साक्षरता (वाचन, लेखन) व संख्याज्ञान विकसित करून देशातील 15 वर्षे आणि त्यावरील वयोगटातील असाक्षर व्यक्तींना महत्वपूर्ण जीवन कौशल्य विकसित करावयाची आहेत.

# राज्यस्तरीय इतिहास प्रज्ञाशोध परीक्षेत चैतन्य विद्यालयाचे सुयश

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

ओतूर येथील ग्राम विकास मंडळ ओतूर संचलित चैतन्य विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय इतिहास प्रज्ञाशोध परीक्षेत घवघवीत यश मिळवल्याची माहिती मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली. याविषयी अधिक माहिती देताना स्पर्धा परीक्षेचे समन्वयक भाऊसाहेब खाडे म्हणाले की,"दरवर्षी जानेवारी महिन्यामध्ये इतिहास शिक्षक महामंडळ महाराष्ट्र राज्य यांचे वतीने राज्यस्तरीय इतिहास प्रज्ञाशोध परीक्षा घेतली जाते. इयत्ता पाचवी ते दहावीचे विद्यार्थी या परीक्षेला प्रविष्ट होत असतात.

यावर्षी ही परीक्षा जानेवारी २०२६ मध्ये संपन्न झाली. विद्यालयाचे २५५ विद्यार्थी या परीक्षेत प्रविष्ट झाले होते. स्पर्धा परीक्षेची पूर्वतयारीचे दृष्टिकोना तून ही परीक्षा महत्त्वाची आहे.



"या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला.या परीक्षेत चैतन्य विद्यालयातील पुढील विद्यार्थ्यां ना प्रथम श्रेणी मिळाली आहे.

इयत्ता पाचवी:- पियुष बोराडे, अविष्कार डुंबरे,आयुष गायकर, कृष्णा गेंगजे,स्वयंभू घोडेकर, अवधूत नलावडे,स्वानंद साठे, साईराज सतविडकर,सात्विक तांबे.

इयत्ता सहावी - स्वर धुमाळ, राजनंदिनी घोलप,रुद्र जाधव, अल्मिरा इनामदार,वीर जायभाये,स्पंदन घुले,स्पंदन खरात.

इयत्ता सातवी:-आरुष कांबळे वरद डोंगरे,स्नेहा डुंबरे,साईराज कांबळे,युवराज खेत्री,हर्ष वामन.

इयत्ता नववी:-वरद नलावडे, स्वरूप साठे. इयत्ता दहावी :-संस्कृती अहिनवे,आदित्य बोरुडे, आदिती ढमाले,ओम डुंबरे,ओम गाढवे,नंदन घोलप,आराध्या गिते,रुद्र गोंदके,तन्वी पंडोरे, सायली पानसरे,नेहा फापाळे, शिवानी रघतवान,सोहम रंधे, ध्रुवी शेटे,अनुष्का शिंदे,थोरात सान्वी

सर्व विद्यार्थ्यांना उपमुख्याध्यापक संजय हिरे, सोनाली कांबळे,अजित डांगे, अमित झरेकर,दिनेश ताठे, बाळासाहेब साबळे,आशा डुंबरे यांनी मार्गदर्शन केले.

सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे ग्राम विकास मंडळ ओतूरचे अध्यक्ष अनिल तांबे,प्रभाकर तांबे, राजेंद्र डुंबरे,रघुनाथ तांबे,प्रदीप गाढवे,पंकज घोलप,संजय वल्हवणकर,अमोल डुंबरे आदींनी अभिनंदन केले आहे.

# वाघोलीत १८ ते २२ मार्चदरम्यान ६८वी महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा

## विजेत्याला मानाची गदा आणि फॉर्च्युनर गाडी

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्रातील अत्यंत प्रतिष्ठेची मानली जाणारी महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा यंदा पुणे जिल्ह्यातील वाघोली येथे रंगणार आहे. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या मान्यतेने आणि पुणे जिल्हा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रामकृष्ण सातव पाटील यांच्या पुढाकाराने ही स्पर्धा १८ ते २२ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. महाराष्ट्र केसरीच्या इतिहासात प्रथमच इतक्या भव्य स्वरूपात स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असल्याचा दावा आयोजकांनी केला आहे.

कुस्ती महर्षी मामासाहेब मोहोळ यांनी महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या माध्यमातून या स्पर्धेची सुरुवात केली होती. राज्यातील कुस्तीपटूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर संधी मिळावी हा या स्पर्धेचा उद्देश होता. गेली ६७ वर्षे सातत्याने आयोजित होत असलेल्या या स्पर्धेचे यंदा ६८वे अधिवेशन पार पडत आहे.

ही स्पर्धा स्व. अजितदादा पवार क्रीडानगरी, बाजार मैदान, वाघोली येथे होणार आहे. स्पर्धेचे उद्घाटन १८ मार्च रोजी उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजित पवार यांच्या हस्ते होणार असून २२ मार्च रोजी समारोप सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहणार आहेत.

स्पर्धेतील विजेत्यांसाठी आकर्षक बक्षिसांचीही घोषणा करण्यात आली आहे. महाराष्ट्र केसरी विजेत्याला मानाची गदा आणि फॉर्च्युनर गाडी, तर उपमहाराष्ट्र केसरी विजेत्याला स्कॉर्पिओ N गाडी देण्यात येणार आहे. याशिवाय माती व गादी



विभागातील सुवर्णपदक विजेत्यांना एकूण १८ बुलेट मोटारसायकली, तर रौप्यपदक विजेत्यांना स्प्लेंडर मोटारसायकल देऊन गौरविण्यात येणार आहे.

स्पर्धेसाठी मातीचे दोन आणि मॅटचे दोन असे चार आखाडे उभारण्यात येणार आहेत. राज्यातील ४२ जिल्हा कुस्ती संघांमधून सुमारे १५०० मल्ल या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. प्रेक्षकांसाठी ३५ ते ४० हजार क्षमतेचे भव्य स्टेडियम उभारण्यात येत असून मोठ्या प्रमाणात पार्किंग व्यवस्था देखील करण्यात आली आहे.

याशिवाय तरुणांना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष स्पर्धाही आयोजित करण्यात आल्या आहेत. उत्कृष्ट रिल्स बनवणाऱ्यास आयफोन, उत्कृष्ट फोटोग्राफीसाठी कॅमेरा लेन्स, तर उत्कृष्ट रॅप सॉंगसाठी १ लाख रुपयांचे बक्षीस देण्यात येणार आहे.

या मानाच्या ऐतिहासिक स्पर्धेला महाराष्ट्रातील कुस्तीप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक रामकृष्ण सातव पाटील यांनी केले आहे.

# महाराष्ट्र राज्य लॉटरीतर्फे फेब्रुवारी २०२६ मधील सोडती जाहीर

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य लॉटरीतर्फे प्रत्येक महिन्यात पाच मासिक व सहा भव्यतम सोडती तसेच साप्ताहिक सोडती काढल्या जातात, फेब्रुवारी २०२६ मध्ये १०/०२/२०२६ रोजी महाराष्ट्र सह्याद्री, १४/०२/२०२६ रोजी महाराष्ट्र गणेशलक्ष्मी माघी गणपती विशेष, १८/०२/२०२६ रोजी महाराष्ट्र गौरव, २०/०२/२०२६ रोजी महाराष्ट्र तेजस्विनी व २५/०२/२०२६ रोजी महाराष्ट्र गजराज या मासिक सोडती दुपारी ४.०० वाजता काढण्यात आल्या आहेत. १०/०२/२०२६ रोजी महाराष्ट्र सह्याद्री या मासिक सोडतीमधून MS2602A-19347 या ओम गंण गणपतेय नमः, पुणे यांचेकडून विक्री झालेल्या तिकिटास रु.१७ लाखाचे प्रथम क्रमांकाचे बक्षिस जाहीर झाले आहे.

# मा. राज्यपाल श्री. जिष्णू देव वर्मा यांच्या अध्यक्षतेखाली महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या ३९वा पदवीप्रदान समारंभाचे आयोजन

**राहुरी विद्यापीठ : (समर्थ गांवकरी)**

महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा 39 वा पदवीप्रदान समारंभ रविवार दि. 15 मार्च, 2026 रोजी सकाळी 10.00 वा. आयोजीत करण्यात आला आहे. कृषि विद्यापीठातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहामध्ये होणार्या या समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल व महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलपती मा. श्री. जिष्णू देव वर्मा हे उपस्थित असणार आहेत. या पदवीप्रदान समारंभामध्ये मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना मानद डॉक्टर ऑफ सायन्स ही पदवी देवून सन्मानीत करण्यात येणार आहे. यावेळी विधान परिषदेचे सभापती मा. ना. श्री. राम शिंदे, महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, कृषि मंत्री तथा महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे प्रतिकुलपती मा. ना. श्री. दत्तात्रय भरणे आणि वित्त, नियोजन, कृषि, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय, कामगार राज्यमंत्री मा. ना. ॲड. आशिष जयस्वाल यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. याप्रसंगी नवी दिल्ली येथील भाकृअप-भारतीय कृषि संशोधन संस्थेचे माजी संचालक आणि भाकृअप-भाकृसंसं अनुवंशशास्त्र विभागाचे मानद शास्त्रज्ञ डॉ. अशोक कुमार सिंग हे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित राहणार असून ते दीक्षांत भाषण करणार आहेत. यावेळी या समारंभासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विलास खर्चे, विद्यापीठ कार्यकारी आणि विद्यापरिषदेचे सदस्य उपस्थित राहणार आहेत. पदवीप्रदान समारंभात गेल्या वर्षातील विविध विद्याशाखांतील एकुण 4,602 स्नातकांना पदवी, पदव्युत्तर, आचार्य पदवीने कुलपती मा.श्री. जिष्णू देव वर्मा यांच्याद्वारे अनुग्रहित करण्यात येणार आहेत. त्यात विविध विद्याशाखातील 4,182 स्नातकांना पदवी, 346 स्नातकांना पदव्युत्तर पदवी तर 74 स्नातकांना आचार्य पदवीने अनुग्रहित केले जाईल. यावेळी 42 यशस्वी स्नातकांना मान्यवरांच्या हस्ते सुवर्ण पदके आणि रोख पारितोषिके प्रदान करुन गौरविण्यात येणार आहे.

# 'अँटी रॅगिंग' विषयावर कार्यशाळा संपन्न

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

रयत शिक्षण संस्थेच्या महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात 'अँटी रॅगिंग : उपाय व वैशिष्ट्ये' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा उत्साहात पार पडली. या कार्यशाळेस प्रमुख पाहुण्या म्हणून ॲड. विजया घोडके उपस्थित होत्या. यावेळी त्यांनी महिलांच्या कायद्यांबाबत मार्गदर्शन करताना रॅगिंग ॲक्टविषयी सविस्तर माहिती दिली. महिलांचा सन्मान राखणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. तरुणपणात भावनांच्या आहारी न जाता विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून आपल्या व्यक्तिमत्त्वाला योग्य दिशा द्यावी, असे आवाहन त्यांनी केले. महाविद्यालयीन परिसरात कोणीही कोणाला त्रास देऊ नये व प्रत्येक विद्यार्थ्याने एकमेकांना सहकार्य करावे, असेही त्या म्हणाल्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे होते. ते म्हणाले की, रॅगिंग ही एक गंभीर समस्या असून शैक्षणिक संस्थांमध्ये त्यावर कठोर बंदी आहे. कोणत्याही विद्यार्थ्याचा शारीरिक किंवा मानसिक छळ होऊ नये. महाविद्यालयीन जीवन हे व्यक्तिमत्त्व घडवण्याचा महत्त्वाचा काळ असून विद्यार्थ्यांनी ज्ञानार्जनावर भर द्यावा, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय समन्वयक डॉ. हरिभाऊ वाघीरे यांनी करून दिला. यावेळी उपप्राचार्य डॉ. सुदाम भुजबळ, डॉ. नितीन थोरात, आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. राहुल गायकवाड, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रियांका म्हस्के यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. अनुराधा ताटे यांनी केले.

# विद्यालयाला उद्योजक आनंद जगदाळे यांच्याकडून लाखोंची मदत



कोरोना काळात आनंदजी जगदाळे यांनी आढळगाव प्राथमिक आरोग्य केंद्राला सुमारे एक लाख रुपये किमतीचे इन्व्हर्टर व बॅटऱ्या दिल्या होत्या. तसेच गेल्या उन्हाळ्यात आढळगाव ग्रामपंचायतीला पाणीपुरवठ्याची अडचण निर्माण झाल्यावर त्यांनी तातडीने दोन बोरवेल करून दिल्या होत्या. आढळगावच्या विकासात व समाजकार्यात आनंदजी जगदाळे यांचे मोठे योगदान असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

आढळगाव येथील पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयाला आढळगावचे भूमिपुत्र व पुण्यातील नामवंत उद्योजक, आयप्लॅनेट क्लाऊड सोल्युशन्स प्रा. लि. कंपनीचे सर्वेसर्वा आदरणीय आनंदजी जगदाळे यांच्या वतीने साऊंड सिस्टिम भेट देण्यात आली.

आढळगाव ग्रामपंचायतीचे सरपंच शिवप्रसाद उबाळे यांच्या अध्यक्षतेखाली पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयात विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा विकास समितीची बैठक सुरू होती. या बैठकीला अनेक सदस्य उपस्थित होते. विद्यालयातील शिक्षक बापू काळे सर व शेळके सर यांनी बैठकीत विद्यालयाला साऊंड सिस्टिमची अत्यंत गरज असल्याचे सांगून ती उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्याची सूचना केली. यानंतर सरपंच शिवप्रसाद उबाळे यांनी पुढाकार घेत आढळगावचे भूषण व उद्योजक आनंदजी जगदाळे यांना दूरध्वनीद्वारे विद्यालयासाठी साऊंड सिस्टिम देण्याची विनंती केली. या विनंतीला सकारात्मक प्रतिसाद देत जगदाळे यांनी तात्काळ कोटेशन पाठविण्यास सांगितले.

विद्यालयाकडून कोटेशन पाठविल्यानंतर अवघ्या आठ दिवसांत त्यांनी साऊंड सिस्टिमचे साहित्य आढळगाव विद्यालयात पोहोचवले. त्यांनी केलेले हे सहकार्य समाजासाठी प्रेरणादायी व दिशादर्शक असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना अभिवादन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.

साऊंड सिस्टिमचे वितरण आढळगाव ग्रामपंचायतीचे विद्यमान सरपंच शिवप्रसाद उबाळे, पंचायत समितीचे माजी सभापती विलासराव भैलूमे, माजी सरपंच नानासाहेब बोळगे, सोसायटीचे माजी चेअरमन दत्ताभाऊ चव्हाण, शिवसेनेचे तालुका उपाध्यक्ष रघुनाथजी सूर्यवंशी, संचालक ज्ञानदेव गाढवे, ग्रामपंचायत सदस्य हनुमंत डोके, पत्रकार अमोल गव्हाणे, सत्यवान शिंदे, जावेद इनामदार, सागर वाकडे, चक्रधर गव्हाणे, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य राम भालेराव आदी मान्यवरांच्या हस्ते विद्यालयाचे प्राचार्य गदादे सर यांच्याकडे करण्यात आले.

यावेळी प्राचार्य गदादे सर, सरपंच शिवप्रसाद उबाळे व माजी सरपंच नानासाहेब बोळगे यांनी उद्योजक आनंदजी जगदाळे यांचे मनापासून आभार मानले. कार्यक्रमास विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षिका व विद्यार्थी उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांचे स्वागत शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बापू काळे सर यांनी केले, तर आभार शेळके व्ही. के. सर यांनी मानले.

# महाराष्ट्र सफाई कर्मचारी आयोगाची बैठक

## सफाई कर्मचाऱ्यांच्या स्थितीचा घेतला आढावा



**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग रुक्कानसिंग डागोर यांच्या अध्यक्षतेखाली नांदेड महानगरपालिकेत शुक्रवारी (१३ मार्च २०२६) महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत महानगरपालिकेत कार्यरत सफाई कर्मचाऱ्यांच्या सद्यस्थितीचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

बैठकीस महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, उपआयुक्त नितीन गाढवे, उपआयुक्त अभिजित वायकोस, सहाय्यक आयुक्त मो. गुलाम सादेक, शहर अभियंता सुमंत पाटील तसेच इतर विभागप्रमुख उपस्थित होते. प्रारंभी आयुक्तांच्या हस्ते शेरसिंग डागोर यांचे स्वागत करण्यात आले.

बैठकीच्या सुरुवातीस उपआयुक्त नितीन गाढवे यांनी महानगरपालिकेतील सफाई व्यवस्थेचे सादरीकरण केले. शहरात एकूण ७ झोन आणि २० प्रभाग असून शहरातील स्वच्छतेची कामे कायमस्वरूपी आणि कंत्राटी सफाई कर्मचाऱ्यांमार्फत केली जात असल्याची माहिती त्यांनी दिली.

महानगरपालिकेच्या मंजूर आकृतीबंधानुसार ८०५ सफाई कर्मचाऱ्यांची पदसंख्या मंजूर असून सध्या ५४९ कायम कर्मचारी कार्यरत आहेत, तर २५६ पदे रिक्त आहेत. याशिवाय कंत्राटदारामार्फत ३३७ सफाई कर्मचारी कार्यरत असल्याचेही सांगण्यात आले. लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार पात्र वारसांना वारसाहक्काने नियुक्ती दिली जाते. तसेच सफाई कर्मचाऱ्यांना चालक, लिपिक आदी गट-क पदांवर पदोन्नतीची संधी दिली जात असून मागील तीन वर्षांत ९६ सफाई कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आल्याची माहिती देण्यात आली. सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने दरवर्षी आरोग्य शिबिरांचे आयोजन केले जाते. तसेच मास्क, हँडग्लोज, एप्रॉन, रेनकोट, गमबूट, नाली फावडे, झाडू आदी स्वच्छता साहित्य पुरवले जाते. ड्रेनेज विभागातील कर्मचाऱ्यांना सेफ्टी बेल्ट, हेल्मेट, सर्च लाईट आणि इतर सुरक्षात्मक साधनेही उपलब्ध करून दिली जातात.

कंत्राटी सफाई कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन, तसेच ईपीएफ, ईएसआयसी आणि घरभाडे भत्ता दिला जात असल्याची माहिती प्रशासनाने दिली. याशिवाय BSUP योजनेअंतर्गत १७७ सदनिका सफाई कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य योजनेतून ८१ कर्मचाऱ्यांना मोफत घरांचा ताबा देण्यात आल्याचेही सांगण्यात आले. बैठकीदरम्यान महापालिका कर्मचारी युनियनचे संस्थापक अध्यक्ष कॉ. गणेश शिंगे यांनी सफाई कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र वसाहत उभारण्याची मागणी केली. त्यावर आयोगाचे अध्यक्ष डागोर यांनी सकारात्मक प्रतिसाद देत मनपा आयुक्तांना याबाबत लक्ष देण्याचे निर्देश दिले. बैठकीच्या शेवटी अध्यक्ष शेरसिंग डागोर यांनी महानगरपालिकेच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त करत बैठकीची सांगता केली.


# ग्रामीण उत्पादनांना आकर्षक पॅकिंग व मार्केटिंगची गरज

- मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली
- नांदेडमध्ये मिनी सरस रेणुका महोत्सवाचे उद्घाटन
- १३ ते १८ मार्चदरम्यान सर्वांसाठी विक्री प्रदर्शन खुले

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

मोठ्या शहरांमधील आर्थिक वाढ ही ग्रामीण भागावरच अवलंबून आहे. ग्रामीण भागातून शेतीमाल खरेदी करून त्याची स्वच्छता व आकर्षक पॅकिंग करून विक्री केली जाते. त्याचप्रमाणे आर्थिक उन्नतीसाठी उमेदच्या स्वयंसहायता गटांनीही आपल्या उत्पादित मालाचे योग्य व आकर्षक पॅकिंग करून वस्तू बाजारात आणल्यास निश्चितच उन्नती होईल, असे प्रतिपादन नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी केले. नांदेड येथील मल्टीपर्पज हायस्कूल येथे उमेद अंतर्गत जिल्हास्तरीय मिनी सरस रेणुका महोत्सव व विक्री प्रदर्शनाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी त्या बोलत होत्या. याप्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले, राज्य अभियान व्यवस्थापक रामदास धुमाळ, माजी जिल्हा परिषद सदस्या पूनम पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, अमित राठोड, मयूरकुमार आंदेलवाड, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. प्रवीणकुमार घुले, कार्यकारी अभियंता संजय शिंदे, समाजकल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार, गट विकास अधिकारी वैष्णव, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक बालाजी नागमवाड, शुभम तेलेवाड, साईचरण, वृदारकादास राठोड आदींची उपस्थिती होती.

# बिलोली पोलीस पाटील संघटनेच्यावतीने पत्रकार राजु पाटलांचा सत्कार



**बिलोली : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने बिलोलीचे जेष्ठ पत्रकार राजु पाटील शिंपाळकर याना नुकतच वाशीम येथे एका आयोजित कार्यक्रमात केंद्रीय मंत्री ना.प्रतापराव जाधव व अनेक प्रमुख मान्यवरांच्या हस्ते राज्यस्तरीय नवचेतना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांना मिळालेल्या पुरस्काराच्या सन्मानार्थ बिलोली तालुका पोलीस पाटील संघटनेच्या वतिने ता. १२ मार्च रोजी त्यांचा बिलोली येथे शाल,श्रीफळ व पुष्पहार देऊन यतोचित सत्कार करण्यात आला.

यावेळी तालुका अध्यक्ष आरविंद पा शिंदे नागनीकर, कलीम पटेल मौ.येसगी, साहेबराव डोंगरे मौ.कोटग्याळ,शंकर मटपती हिप्परगा थडी, पांडुरंग रामपुरे,सय्यद रियाज,दुर्गादास पाटील, सायन्ना पांचाळ केसराळी, अनिल पा. नरवाडे गुजरीकर, देवराव शिंदे,प्रकाश पाटील, राजु पा. मंदरने ,अब्दुल शेख, शिवराज शिरसेटवार, संजय पाटील दर्यापुरकर, विठ्ठल तुकडे,नामदेव नरवाडे,शिवराज भुले, जयराज पा. हिंगणीकर यांच्यासह आनेक पोलीस पाटील व मित्र मंडळी उपस्थित होते.यावेळी प्रस्तावना करताना पोलीस पाटील संघाचे सोशल मिडीया जिल्हा प्रसिध्दी प्रमुख साहेबराव डोंगरे म्हणाले की राजु पाटील शिंपाळकर यांनी गेल्या काही दशका पासुन पत्रकारितेच्या माध्यमातून सर्व जाती धर्माच्या लोकांसोबत जुळवलेली जिव्हाळ्याची नाळ व विविध सामाजिक कार्यातुन शेतकरी, शेतमजुर,निराधार, दिव्यांग, गोरगरीब आशा विविध घटकतील लोकांसाठीच्या न्याय हक्कासाठी आसलेली त्यांची सततची चळवळ ही सर्वाना प्रेरणादायक दिशा देणारी आसल्याचे मत व्यक्त करत त्यांच्या कार्यावर कौतुकाचा वर्षाव केला गेला.

# धनगर आरक्षणासाठी महाधिवक्ता यांच्यासोबत बैठक

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

धनगर समाजाच्या आरक्षणाबाबत कायेदशीर तोडगा काढण्यासाठी धनगर समाजाच्या शिष्टमंडळासोबत राज्याच्या महाधिवक्ता यांच्या सोबत बैठकीचे तातडीने आयोजन करण्यात येईल, जेणेकरुन धनगर बांधवाच्या आरक्षणासंदर्भात कायदेशीर दिशा स्पष्ट होईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. विधानभवन येथे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली धनगर आरक्षणासंदर्भात समाजाच्या शिष्टमंडळाच्या मागण्यांसंदर्भात बैठक झाली, त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते.

बैठकीस जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, खासदार रामराव वडकुते, शिष्टमंडळाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# जबरी चोरीचा १२ तासांत उलगडा; स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कामगिरी

**वसमत : (समर्थ गांवकरी)**

वसमत शहरातील रेल्वे स्टेशन परिसरात सुरू असलेल्या बांधकाम साईटवर झालेल्या जबरी चोरीच्या घटनेचा अवघ्या १२ तासांत उलगडा करत स्थानिक गुन्हे शाखेने धडाकेबाज कारवाई केली आहे. या कारवाईत चोरीस गेलेले सुमारे ३०० किलो स्टील जप्त करण्यात आले असून एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, वसमत रेल्वे स्टेशन परिसरात सध्या रेल्वे स्टेशनचे बांधकाम व दुरुस्तीचे काम सुरू असून त्या ठिकाणी लाखो रुपयांचे बांधकाम साहित्य ठेवण्यात आले आहे. साहित्याच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे तसेच २४ तास सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे. दि. ११ मार्च २०२६ रोजी रात्री ८ ते ९ वाजण्याच्या सुमारास सुरक्षा रक्षक कांबळे हे कर्तव्यावर असताना दोन अज्ञात चोरट्यांनी साईटवर प्रवेश करून त्यांच्या वर दगडफेक केली व जबरदस्तीने अंदाजे ३०० किलो स्टील चोरी करून नेले. या प्रकरणी वसमत शहर पोलीस ठाण्यात गु.र.नं. १४९/२०२६ अन्वये संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेची गंभीर दखल घेत हिंगोलीचे पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांनी स्थानिक गुन्हे शाखेला तातडीने तपास करून आरोपींना अटक करण्याचे आदेश दिले. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि शिवसांब घेवारे यांच्या पथकाने तपासाची चक्रे वेगाने फिरवली. सीसीटीव्ही फुटेज व गोपनीय माहितीच्या आधारे आरोपींची ओळख पटवण्यात पोलिसांना यश आले. आरोपी १) अजय सतपाल चावरीया (वय ३५, रा. तथागत नगर, रेल्वे स्टेशनजवळ, वसमत) व २) दिलीपसिंग जोगनसिंग चव्हाण (रा. समीर नगर, वसमत) अशी त्यांची नावे आहेत. पोलिसांनी अजय सतपाल चावरीया याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याच्याकडून चोरीस गेलेले सुमारे ३०० किलो स्टील, अंदाजे किंमत १६,२०० रुपये, असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन, अप्पर पोलीस अधीक्षक कमलेश मीना, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक मोहन भोसले व वसमत शहर पोलीस ठाण्याचे पोनि सुधीर वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि शिवसांब घेवारे, पोलीस अंमलदार भुजंग कोकरे, गजानन पाकळे, ज्ञानेश्वर गोरे, आकाश टापरे, नरेंद्र साळवे, साईनाथ कंठे तसेच वसमत शहर पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पथकाने पार पाडली.

अवघ्या १२ तासांत जबरी चोरीचा गुन्हा उघडकीस आणून संपूर्ण मुद्देमाल हस्तगत केल्याने पोलीस अधीक्षकांनी पथकाचे विशेष कौतुक केले आहे.

# चुपा चुप्स कंपनीने क्रेझी रॅफे नावाची लांब, ट्विस्टेड जेली आणली बाजारात ज्यामुळे मिळणार मजेशीर खाण्याचा आनंद येणार परत

## मजेदार आणि चवदार कँडी खायला आवडणाऱ्या किशोरवयीन मुलांसाठी खास बनवलेली

**(समर्थ गांवकरी)**

परफेट्टी व्हॅन मेल्ले कंपनीचा कन्फेक्शनरी ब्रँड चुपा चुप्सने क्रेझी रॅफे नावाची नवीन जेली बाजारात आणली आहे, ही जेली लांब, वाकडी-तिरपी असून आतमध्ये फिलिंग आहे, त्यामुळे रोजच्या स्नॅकिंगला मजेशीर ट्विस्ट मिळतो, दिसायला वेगळी आणि मजेदार असल्यामुळे किशोरवयीन आणि लहान मुलांसाठी खास तयार केली आहे. 30 ग्रॅ वजनाची ही जेली ₹20 ला मिळते. क्रेझी रॅफे तयार करताना एक साधी पण महत्त्वाची गोष्ट लक्षात घेतली. आजची तरुण पिढी फक्त चव बघत नाही. त्यांना दिसायला मजेदार, खेळता येईल अशी आणि मित्रांसोबत शेअर करता येईल अशी कँडी आवडते. रोजच्या क्षणांत थोडी मजा आणि




उत्सुकता आणणारे स्नॅक्स त्यांना हवे असतात. लांब आणि वाकडी-तिरपी आकाराची जेली आणि जिराफपासून प्रेरित डिझाइनमुळे क्रेझी रॅफे साध्या कँडीला मजेशीर अनुभव देते. या जेलीच्या बाहेर स्ट्रॉबेरी चवीचे कव्हर आहे, जे लाल रंगाच्या 2 छटांमध्ये दिसते, आतमध्ये क्रीमी व्हॅनिला फिलिंग आहे. आंबट आणि गोड चव एकत्र आल्यामुळे खाण्याचा वेगळा अनुभव मिळतो, लांब आणि वाकडी-तिरपी आकारामुळे ही जेली ताणून खाणे, मित्रांसोबत शेअर करणे आणि मज्जा घेत घेत खाणे सोपे होते. ब्रेकमध्ये किंवा मित्रांसोबत गप्पा मारताना क्रेझी रॅफे खाण्यात वेगळी मजा देते. परफेट्टी व्हॅन मेल्ले इंडियाच्या मार्केटिंग विभागाच्या संचालिक गुंजन खेतान या नवीन सुरुवातीबद्दल बोलतांना म्हणाल्या, "चुपा चुप्स हा ब्रँड क्रिएटिव्हिटी, स्वतःची ओळख आणि मजा यासाठी ओळखला जातो. क्रेझी रॅफेमधून आजच्या किशोरवयीन मुलांसाठी काहीतरी नवीन, मजेदार आणि खेळकर फॉरमॅट देण्याचा प्रयत्न केला आहे. ही फक्त चवीसाठीनाही, तर रोजच्या क्षणांना थोडी मजा आणि वेगळा अनुभव देण्यासाठी आहे. लांब वाकडी-तिकडी जेली आणि आतले फिलिंग यामुळे खाण्यात छोटा सरप्राइज मिळतो. त्यामुळे जेली प्रकारात पुन्हा उत्सुकता आणि चर्चा वाढेल अशी अपेक्षा आहे." जिराफपासून प्रेरित पॅकेजिंगमुळे या प्रॉडक्टचा लूक आणखी वेगळा दिसतो, त्यामुळे दुकानाच्या शेल्फवर तो लगेच लक्ष वेधून घेतो. लांब आणि आकर्षक डिझाइनमधून ब्रँडचा अनुभव देण्याचा विचार दिसतो तसेच तरुण ग्राहकांनी रोजच्या छोट्या क्षणांत थोडी मजा आणि आनंद घ्यावा, असा संदेश यातून दिला आहे.

भारतामध्ये कन्फेक्शनरी बाजार सतत बदलत आहे, आता लोकांना फक्त चव नाही, तर मजा देणारे आणि वेगळा अनुभव देणारे स्नॅक्सही आवडत आहेत. चुपा चुप्सने क्रेझी रॅफेमधून तरुणांना आवडेल असा नवीन आणि वेगळी कँडी अनुभव देण्याचा प्रयत्न केला आहे.

# वरळीत गॅस सिलिंडरचा काळाबाजार उघड

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

वरळी परिसरात घरगुती आणि व्यावसायिक गॅस सिलिंडरचा काळाबाजार करणाऱ्या टोळीवर शिधावाटप विभागाने धडक कारवाई करत मोठा साठा जप्त केला. रहिवासी भागात धोकादायक पद्धतीने सिलिंडर साठवून काळ्या बाजारात विक्री केली जात असल्याचा प्रकार या कारवाईत उघडकीस आला. नियंत्रक शिधावाटप कार्यालयाच्या फिरत्या पथकाने आणि कार्यालय क्रमांक २१ च्या अधिकाऱ्यांनी संयुक्तपणे ही कारवाई केली. वरळी नाका येथील गणपतराव कदम मार्गावरील 'सूरज वल्लभदास चाळ' परिसरात गॅस सिलिंडरची अवैध साठेबाजी करून चढ्या दराने विक्री केली जात असल्याची गोपनीय माहिती प्रशासनाला मिळाली होती. त्यानुसार पथकाने तातडीने छापा टाकत अवैधरित्या साठवलेले सिलिंडर जप्त केले.

# कुंटूर पोलिसांची अवैध देशी दारू व शिंदी विक्री करणाऱ्यावर दोघांवर गुन्हा दाखल

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

नायगाव तालुक्यातील कुंटूर बसस्टॉप वर गेल्या अनेक दिवसांपासून अवैध देशी विदेशी दारू विक्री व शिंदी विक्री केली जात होती.दिनांक १३ मार्च रोजी शिंदी व देशी विक्री करणाऱ्या दुकानावर कुंटूर पोलिसांनी धडक कारवाई करत दोघांना मुद्देमालासह ताब्यात घेतले. ही कारवाई कुंटूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल डी भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, अवैध दारू विक्री व शिंदी विक्री सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक कारामुंगे , हेड कॉन्स्टेबल खंदारे , कॉन्स्टेबल स्वप्नील हंबर्डे व कॉन्स्टेबल पल्लेवाड यांनी संबंधित ठिकाणी अचानक धाड टाकून दोघांना मुद्देमालासह पकडण्यात आले.



पोलिसांनी जप्त केलेल्या मुद्देमालात शिंदीचे भरलेले पोते(५५ पॉकेट) देशी दारू च्या १८ बॉटल असा साठा जप्त करण्यात आला असून आरोपी दोन जनावरं रा कुंदुर यांना ताब्यात घेऊन पुढील कारवाईसाठी त्यांना पोलीस स्टेशन कुंटूर येथे नेण्यात आले. संबंधित आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम 1949 च्या कलम 65 (ई), अन्वये अवैध देशी दारूची, शिंदी विक्री व साठा केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे कुंटूर परिसरात अवैध दारू विक्री वाढत आहे.

# चिमुकल्या 'अर्श' ने केला रमजान चा पहिला उपवास

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील कोतुळ येथील व्यवसायिक समीर यासीन पठाण यांचा नातू आणि रहेमत नगर, संगमनेर येथील आयशा अरबाज शेख यांचा चिरंजीव अर्श अरबाज शेख या अडीच वर्षाच्या चिमुकल्याने पवित्र रमजान महिन्यात आपला पहिला उपवास केला आहे अवघ्या अडीच वर्षे वयात रमजान चा उपवास करणारा अर्श शेख पहिला लहान मुलगा ठरला आहे चिमुकल्या वयात उपवास करणाऱ्या अर्श शेख चे संगमनेर व अकोले तालुक्यातील मुस्लिम बांधवानी कौतुक केले आहे वयाच्या अवघ्या अडीच वर्षात आपला पहिला रोजा पूर्ण करून भक्तीआणि संस्कारांचा आदर्श अर्श ने घालून दिला. रमजान महिना हा मुस्लिम बांधवांचा पवित्र महिना असतो, या महिन्यात सर्व मुस्लीम बांधव एक महिन्याचे निरंकार उपवास करतात. इस्लाम धर्मातील सर्वात पवित्र मानला जाणारा रमजान महिना १९ फेब्रुवारीपासून सुरू झाला. जगभरातीलमुस्लिम बांधव या महिन्यात आत्मशुद्धी, संयम आणि भक्तीचा संदेश देतात.कडक उन्हाळ्याचे दिवस असतानाही चिमुकल्या अर्श ने कोणतीही तक्रार न करता उत्साहाने आपला पहिला उपवास पूर्ण केला. एवढ्या लहान वयात अर्श ने दाखवलेली जिद्द, श्रद्धा आणि भक्ती पाहून कुटुंबीयांसह परिसरातील नागरिकांनीही भारावून गेले.



# स्मार्ट मॉर्निंग न्यूट्रिशनच्या शक्तीने आपली इम्युनिटी मजबूत करा

## शीला कृष्णास्वामी, न्यूट्रिशन आणि वेलनेस कंसल्टंट

**(समर्थ गांवकरी)**

हंगामी विषाणूजन्य संसर्ग हवामान बदलाच्या काळात उच्चतम स्तरावर पोहोचतात, त्यामुळे आपल्या रोगप्रतिकारक शक्तीला बळकट करणे अत्यावश्यक आहे. सर्दी, फ्लू, आणि इतर श्वसन आजार या परिस्थितीत वाढतात, त्यामुळे दिवसाच्या सुरुवातीपासून पोषक अन्नासह आपल्या शरीराला समर्थन देणे महत्त्वपूर्ण फरक निर्माण करू शकते. एक चांगले संतुलित सकाळचे रूटीन आपल्या रोगप्रतिकारक शक्तीला प्रभावीपणे कार्य करण्यासाठी आवश्यक मूलभूत समर्थन प्रदान करू शकते. बदाम, अंडी, संत्रीजन्य फळे, फर्मेंटेड अन्नपदार्थ, संपूर्ण धान्ये यासारखे अन्न दिवसाच्या सुरुवातीस समाविष्ट केल्यास ऊर्जा आणि महत्त्वपूर्ण सूक्ष्म पोषक घटक मिळतात जे रोगप्रतिकारक कार्याला समर्थन देतात आणि दाह कमी करतात. सकाळच्या जेवणात समाविष्ट करण्यासाठी येथे चार सोपे पर्याय आहेत.

बदाम : बदाम हे १५ पोषक घटकांचे स्रोत आहेत, ज्यात व्हिटॅमिन ई, मॅग्नेशियम, प्रथिन, रिबोफ्लेविन, आणि झिंक यांचा समावेश आहे. हे घटक एकत्रितपणे अँटीऑक्सिडंट क्रियाशीलता आणि रोगप्रतिकारक पेशींच्या कार्याला समर्थन देतात. दिवसाची पौष्टिक सुरुवात करण्यासाठी त्यांना पोरीज किंवा दहीमध्ये घालावे किंवा जसे आहेत तसे खाल्ले पाहिजे.



अंडी : अंडी उच्च प्रतीचे प्रथिन तसेच व्हिटॅमिन डी आणि इतर पोषक घटक प्रदान करतात, जे रोगप्रतिकारक नियंत्रण, टी-सेल क्रियाशीलता आणि अनेक इतर कार्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यांचा आनंद उकडून, पोच करून किंवा स्पिनॅच आणि संपूर्ण गव्हाच्या टोस्टसह स्क्रॅम्बल करून घेता येतो, ज्यामुळे सकाळचे जेवण संपूर्ण आणि पौष्टिक बनते.

संत्र्याचे फळे : संत्रा, ग्रेपफळ आणि मुसंबी मध्ये व्हिटॅमिन सी असते, जे रोगप्रतिकारक शक्तीला समर्थन देते आणि शक्तिशाली अँटीऑक्सिडंट म्हणून कार्य करते. हे जोडी आपल्या शरीराच्या हानिकारक सूक्ष्मजीवांविरुद्धच्या पहिल्या संरक्षणाची ताकद वाढवते. त्यांचा आनंद संपूर्ण फळ म्हणून किंवा पाण्यात घालून ताजेतवाने बूस्ट मिळवण्यासाठी घेता येतो. संत्र्याच्या फळांशिवाय, आवळा आणि पेरू यामध्येही व्हिटॅमिन सी मुबलक प्रमाणात असते. जेव्हा शक्य असेल तेव्हा त्यांचा आनंद घ्या.

फर्मेंटेड अन्नपदार्थ : आरोग्यदायी गट माइक्रोबायोम रोगप्रतिकारक शक्ती बळकट करण्यास आणि शरीराच्या संसर्गाविरुद्ध लढण्याच्या क्षमतेला सुधारण्यास महत्त्वाची भूमिका बजावतो. दही, सकाळचे पदार्थ जसे ढोकळा, इडली, डोसा, फर्मेंटेड तांदळाचा पोरीज इत्यादी समाविष्ट केल्यास सकाळी गटास अनुकूल बॅक्टेरियाची वाढ होते. सकाळच्या आहारात हे अन्नप्रकार प्राधान्याने समाविष्ट केल्यास हंगामी रोगांविरुद्ध प्रतिकारशक्ती तयार होते. सातत्य महत्वाचे आहे, आणि या पर्यायांसह पुरेशी झोप, संतुलित जेवण आणि योग्य हायड्रेशन जोडल्यास एकूण आरोग्यास अधिक समर्थन मिळते.

# त्र्यंबक-नाशिकचा कुंभमेळा जगाला आकर्षण वाटणारा असावा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : त्र्यंबक-नाशिक कुंभमेळ्यासाठी २२ हजार १८१ कोटी रुपयांच्या कामांना मान्यता : नाशिक सिंहस्थ कुंभमेळा शिखर समिती बैठक

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**



त्र्यंबक- नाशिक मध्ये सिंहस्थ कुंभमेळ्याचे आयोजन २०२७ मध्ये करण्यात येत असून या कुंभमेळ्यात देश-विदेशातून करोडो भाविक येणार आहेत. कुंभमेळ्याच्या माध्यमातून येथे येणारा प्रत्येक भाविक भारताची पर्यायाने महाराष्ट्राचे प्रतिबिंब सोबत नेणार आहे. त्यामुळे याच्या यशस्वी आयोजनातून जगाला आकर्षण वाटणारा कुंभमेळा करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

त्र्यंबक-नाशिक सिंहस्थ कुंभमेळाकरिता करण्यात येत असलेल्या विविध कामांसाठी २२ हजार १८१ कोटी रुपयांच्या कामांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली विधान भवनात आयोजित कुंभमेळा शिखर समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. यामध्ये पहिल्या टप्प्यातील ५ हजार १४० कोटी आणि दुसऱ्या टप्प्यातील १७ हजार ४१ कोटी रुपयांच्या कामांचा समावेश आहे. कुंभमेळा निमित्त सुरू असलेली आणि प्रस्तावित असलेल्या कामांमध्ये कुणी वाईट हेतूने किंवा मुद्दाम विलंब होण्याच्या हेतूने अडथळा आणत असेल, तर त्याची गय केली जाणार नाही. त्याच्याविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशाराही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिला.

बैठकीला अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र सिंह राजे भोसले, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, आमदार सीमा हिरे, आमदार देवयानी फरांदे, आमदार सरोज अहिरे, आमदार सर्वश्री पंकज भुजबळ, माणिकराव कोकाटे, दिलीप बनकर, हिरामण खोसकर, राहुल ढिकले, नाशिकच्या महापौर हिमगौरी आहेर उपस्थित होत्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, कुंभमेळा निमित्ताने करण्यात येणाऱ्या कामांकरिता लागणाऱ्या जमिनीच्या भूसंपादनाचा योग्य मोबदला शेतकऱ्यांना देण्यात यावा. नाशिक वर्तुळ मार्गातील अडथळे दूर करीत विशेष बाब म्हणून ५० टक्के भूसंपादन पूर्ण झाल्यानंतर रस्त्याच्या कामाला सुरुवात करावी. कुंभमध्ये स्वच्छता अत्यंत महत्वाची असून या कामांमध्ये करण्यात येणारी शौचालय दर्जेदार असावी. कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिकच्या परिसरातील स्थानकांची पायाभूत सुविधांची कामे रेल्वेच्या माध्यमातून सुरू करण्यात येत आहेत. यामध्ये निफाड रेल्वे स्थानकाचाही समावेश करण्यात यावा, याबाबत रेल्वेने पडताळणी करून कार्यवाही करावी.

कुंभमेळ्यासाठी येणारे भाविक शिर्डी व शनिशिंगणापूरला निश्चितपणे जाणार आहेत. त्यामुळे शिर्डी ते नाशिक रस्त्याचे काम करण्यात यावे. कुंभमेळ्यात येणाऱ्या भाविकांना संपर्कामध्ये कुठलीही अडचण होऊ नये, म्हणून मोबाईल संपर्काची व्यवस्था भक्कम असावी. त्यासाठी आतापासूनच तयारी करण्यात यावी. द्वारका जंक्शन येथे वाहतूक सुरळीत करण्यासाठी सुरू असलेल्या कामांमध्ये अंतर्गत रस्त्यांचा विचार करून परिसरातील रस्त्यांचा एकीकृत विकास करावा. नवीन घाटांच्या जागेकरिता शेतकऱ्यांना मोबदला देण्यात यावा, यासाठी विशिष्ट पद्धतीचा अवलंब करावा. त्र्यंबकेश्वर येथील कुशावर्त व नाशिक येथील गोदावरी नदीतील पाणी कुंभमेळा दरम्यान शुद्ध राहण्यासाठी यंत्रणांनी विशेष काळजी घ्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

नाशिक येथील काळाराम मंदिराचे काम करताना आजूबाजूच्या वाहतुकीला अडथळा होणार नाही, याबाबत दक्षता घेण्यात यावी. राम काल पथाच्या कामाला गती देण्यात यावी. शहरातील ऑप्टिकल फायबर केबलचे काम वेगाने पूर्ण करावे. तसेच स्मार्ट सिटी प्रकल्पातील नादुरुस्त सीसीटीव्ही बाबत पडताळणी करून नवीन सीसीटीव्ही कार्यान्वित करण्यासाठी उच्चस्तरीय समितीची मान्यता घ्यावी. अमृत स्नानांच्या दरम्यान शहरातील भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता महाविद्यालयांमधील जागा पार्किंग तसेच पोलिसांसाठी घेण्याबाबत संबंधित विभागाशी चर्चा करून निर्णय घ्यावा. निवृत्तीनाथ मंदिर ट्रस्टच्या कामांचा समावेश करून पुढील कार्यवाही करण्यात यावी.

नाशिक शहर व परिसरातील जवळपास दोन ते चार हजार मुलांना कुंभमेळ्याच्या निमित्ताने आवश्यक कौशल्याचे प्रशिक्षण देऊन त्यांना स्वयंसेवक म्हणून काम करण्यासाठी प्रेरित करावे. महिला बचत गटांच्या कुंभमेळातील समावेशनाबाबत पडताळणी करून तशा पद्धतीचे बिझनेस मॉडेल उभारावे, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

बैठकीत नाशिक त्रंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी सादरीकरण केले.

बैठकीला मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (गृह) मनिषा म्हैसकर, अपर मुख्य सचिव (परिवहन) संजय सेठी, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी गुप्ता, नाशिकचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, मनपा आयुक्त मनीषा खत्री आदी उपस्थित होत्या. तसेच नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त जलज शर्मा यांनी दूरदृश्य संवाद प्रणाली द्वारे बैठकीत सहभाग घेतला.

# ॲमेझॉन एमएक्स प्लेयरकडून २०२६ करिता १५०+ नवीन कार्यक्रमांसह भव्य कलाकृतींचे अनावरण

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**




भारतातील आघाडीची मोफत स्ट्रिमिंग सेवा असलेल्या ॲमेझॉन एमएक्स प्लेयरने आज 2026 साठी 150 हून अधिक नवीन आणि परतून येणाऱ्या कार्यक्रम (रिटर्निंग शो) चे अनावरण करत, आतापर्यंतच्या सर्वात विस्तृत कलाकृतींची घोषणा केली. शैली, स्वरूप आणि कथाकथन प्रकारांमध्ये विस्तारलेल्या कलाकृती देशभरातील प्रेक्षकांना या वैविध्यपूर्ण कथा पूर्णपणे मोफत उपलब्ध करून उच्च दर्जाची करमणूक देणाऱ्या मंचाच्या ध्येयाला बळकटी देते. कलाकृतींच्या गुलदस्त्यात अग्रस्थानी असलेल्या प्रमुख शीर्षकांपैकी नसिरुद्दीन शाह आणि जिम सर्भ अभिनीत 'मेड इन इंडिया: द टायटन स्टोरी' हे महत्त्वाकांक्षा आणि वारसा निर्माण करण्यावर केंद्रित प्रेरणादायी नाट्य आहे. नाना पाटेकर, संजय कपूर, नीरज काबी आणि मोहम्मद झीशान अयूब यांच्या प्रमुख भूमिका असलेला 'संकल्प' हा सत्ता तसेच नेतृत्व पैलूंचा शोध घेणारा एक मनोरंजक सामाजिक-राजकीय थ्रीलर आहे. न्याय, सूडबुद्धी आणि थरार या संकल्पनांवरील 'अब होगा हिसाब', ज्यात शाहीर शेख, मौनी रॉय आणि संजय कपूर झळकणार आहेत. तसेच अमोल पराशर अभिनीत 'द ब्युरोक्रॅट' सारख्या प्रशासकीय नाट्य पाहता येईल. साकिब सलीम अभिनीत 'कप्तान', सनी हिंदुजा अभिनीत 'विमल खन्ना', दिव्येंदु शर्मा आणि भुवन अरोरा अभिनीत कॉप ड्रामा 'वेटिंग है' सोबतच रवी किशन, अमेय वाघ आणि विशाल जेठवा अभिनीत 'क्लीन अप क्रू' हा क्राइम ड्रामा झळकणार आहे. एकत्रितपणे, या कलाकृती ॲमेझॉन एमएक्स प्लेअरची व्याप्ती आणि विकसित होणारी सर्जनशील दृष्टी प्रतिबिंबित करतात. कारण त्या प्रेक्षकांसाठी उत्कृष्ट कथानके घेऊन येणार आहेत. राजीव खंडेलवाल, आमिर अली, रवी बहल आणि बरखा बिष्ट यांच्या भूमिका असलेला 'अमर विश्वास' हा कायद्यावरील कोर्टरूम ड्रामा अलीकडच्या कलाकृतींनी निर्माण केलेल्या जोरदार वातावरणात आगामी पर्याय तयार करतो आहे. अशाप्रकारची विविधांगी पैलू असलेली कथानकं प्रेक्षकांना अधिक भावतात.

तेजस्वी प्रकाश आणि रवी किशन अभिनीत 'सायको सैयां' या रोमँटिक थ्रीलरने प्रखर कथानकांसह प्रेक्षकांना गुंतवून ठेवणारी कलाकृती बनवली आहे.

# लोकसंग्रह अन् सहकाराचा 'तुकाराम मामा'

**पाचव्या पुण्यस्मरणानिमित्त भावपूर्ण श्रद्धांजली!**

**रोहोकडी (ता.जुन्नर) : (समर्थ गांवकरी)**



रोहोकडी गावचे सुपुत्र, प्रगतशील शेतकरी तसेच 'रोहोकडी विविध विकास कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी' चे माजी व्हाईस चेअरमन कै. तुकाराम रभाजी हिंगणे उर्फ 'तुकाराम मामा' यांच्या पाचव्या पुण्यस्मरणानिमित्त त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे. आपल्या कर्तृत्व, माणुसकी आणि समाजकार्यामुळे पंचक्रोशीत आपली वेगळी ओळख निर्माण करणारे तुकाराम मामा आजही परिसरातील नागरिकांच्या स्मरणात जिवंत आहेत.

तुकाराम मामांचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी होते. प्रगतशील शेतकरी म्हणून त्यांनी शेती क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या मामांनी कष्ट, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर शेतीत प्रगती साधली. पारंपरिक शेतीला आधुनिकतेची जोड देत पाण्याचे नियोजन, खतांचा संतुलित वापर आणि बदलत्या बाजारपेठेचा अभ्यास करून त्यांनी शेती अधिक फायदेशीर केली. स्वतःच्या प्रगतीबरोबरच परिसरातील अनेक तरुण शेतकऱ्यांना मार्गदर्शन करून त्यांनी आधुनिक शेतीची दिशा दाखवली.

सहकार क्षेत्रातही त्यांचे योगदान मोलाचे होते. 'रोहोकडी विविध विकास कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी' चे व्हाईस चेअरमन म्हणून काम करताना त्यांनी संस्थेचा कारभार पारदर्शक ठेवत सभासदांच्या हिताला प्राधान्य दिले. शेतकऱ्यांना वेळेवर कर्जवाटप व्हावे, पीकविम्याचे लाभ मिळावेत आणि सहकार संस्थांवर लोकांचा विश्वास टिकून राहावा यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.

तुकाराम मामांचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांची भक्ती आणि कला. परिसरात भजनामध्ये उत्कृष्ट पेटी (हार्मोनियम) वादक आणि गायक म्हणून ते ओळखले जात होते. विठ्ठलभक्तीने ओतप्रोत भरलेल्या त्यांच्या भजनांमुळे गावातील धार्मिक आणि सांस्कृतिक वातावरण नेहमीच उत्साही राहायचे. त्यांच्या निधनाने भजनी परंपरेतही मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची अफाट माणुसकी आणि साधेपणा. कोणत्याही सामाजिक कार्यात किंवा गावातील सुख-दुःखाच्या प्रसंगी ते नेहमी अग्रभागी असायचे. चेहऱ्यावर कायम हसू, मनात कुणाबद्दलही वैर नसलेला स्वभाव आणि सर्वांना जोडून ठेवण्याची वृत्ती यामुळे ते पंचक्रोशीत 'लाडके मामा' म्हणून प्रसिद्ध होते.

मामांनी आपल्या कुटुंबालाही समाजसेवेचे संस्कार दिले. त्यांच्या पश्चात त्यांचे सुपुत्र सुरेश हिंगणे, शाम हिंगणे आणि मनोहर हिंगणे (पत्रकार) तसेच संपूर्ण हिंगणे परिवार त्यांच्या समाजकार्याचा वारसा पुढे नेत आहेत.

कै. तुकाराम मामा हिंगणे यांच्या पाचव्या पुण्यस्मरणानिमित्त शनिवार, दि. १४ मार्च २०२६ रोजी रोहोकडी (महालक्ष्मीनगर) येथे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९.३० वाजता प्रतिमेचे पूजन, सकाळी १० वाजता ह.भ.प. भास्कर महाराज जगदाळे (गोहे बुद्रुक) यांचे प्रवचन, तर सकाळी ११ वाजता अन्नप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे.

या कार्यक्रमाला नातेवाईक, आप्तेष्ट व ग्रामस्थांनी उपस्थित राहून पुण्यस्मरण कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन हिंगणे परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे. कै. तुकाराम मामा हिंगणे यांच्या कार्याची आणि माणुसकीची आठवण आजही अनेकांना प्रेरणा देत आहे. त्यांच्या पाचव्या पुण्यस्मरणानिमित्त त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

# तहसीलदार कार्यालयासमोर नागरिकांचे बेमुदत उपोषण

- पाचव्या दिवशीही प्रशासनाकडून दखल नाही
- मोकळ्या जागेचे व ३० फूट रस्त्याचे मोजमाप करून नगरपंचायतीने ताबा घ्यावा, नागरिकांची मागणी

**सेनगाव : (समर्थ गांवकरी)**




सेनगाव येथील सर्व्हे क्रमांक १६०/२, गट क्रमांक ९४४ मधील एनए लेआउटमध्ये दर्शविण्यात आलेल्या ५४०० चौरस फूट मोकळ्या जागेचे आणि ३० फूट रुंदीच्या रस्त्याचे अधिकृत मोजमाप करून त्याचा ताबा नगरपंचायतीने घ्यावा, या मागणीसाठी नागरिकांनी ९ मार्चपासून सेनगाव तहसीलदार कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू केले आहे. उपोषणाचा पाचवा दिवस सुरू असतानाही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने आंदोलकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.मिळालेल्या माहितीनुसार, दिवंगत जगदीश गुलाबचंद तिवारी यांच्या मालकीच्या सुमारे ०.८० आर क्षेत्रफळाच्या जमिनीवर १९८४ साली एनए लेआउट मंजूर करण्यात आला होता. या लेआउटनुसार एकूण १८ भूखंड तयार करण्यात आले होते. त्यामध्ये सुमारे ५४०० चौरस फूट मोकळी जागा आणि ३० फूट रुंदीचा रस्ता सार्वजनिक वापरासाठी राखीव ठेवण्यात आला आहे. मात्र, अनेक वर्षे उलटूनही नगरपंचायतीने या राखीव जागेचे मोजमाप करून अधिकृत ताबा घेतलेला नसल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.या संदर्भात नागरिकांनी यापूर्वीही अनेकदा प्रशासनाला निवेदने दिली होती. ७ मार्च २०२५ रोजी याच मागणीसाठी आंदोलन करण्यात आले होते. त्यावेळी प्रशासनाने संबंधित जागेच्या मोजमापाबाबत लवकर कारवाई करण्याचे लेखी आश्वासन दिले होते.त्या आश्वासनानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. मात्र, त्यानंतर वर्षभराचा कालावधी उलटूनही प्रत्यक्षात कोणतीही कार्यवाही झाली नसल्याने नागरिकांनी पुन्हा एकदा आंदोलनाचा मार्ग स्वीकारत बेमुदत उपोषण सुरू केले आहे.महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना कायद्यानुसार (एमआरटीपी) एनए लेआउटमध्ये किमान १० टक्के जमीन सार्वजनिक वापरासाठी राखीव ठेवणे तसेच ती संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेकडे विनामूल्य हस्तांतरित करणे बंधनकारक आहे. तरीही संबंधित मोकळी जागा व रस्ता नगरपंचायतीच्या ताब्यात न दिल्याने नियमांचे उल्लंघन होत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे.दरम्यान,आंदोलकांनी प्रशासना समोर तीन प्रमुख मागण्या मांडल्या आहेत. त्यामध्ये मोकळ्या जागेचे व ३० फूट रस्त्याचे तातडीने मोजमाप करून नगरपंचायतीने ताबा घ्यावा.


# अतिक्रमण धारकांचे पुनर्वसन करा

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील अतिक्रमण धारकांच्या पुनर्वसनासंदर्भात संबंधित यंत्रणांनी कायमस्वरूपी तोडगा काढावा. पुनर्वसनासाठी उपलब्ध असलेल्या जवळील जागांची पडताळणी करून पुनर्वसनासंदर्भात नियोजन करावे. निश्चित कालावधीत उद्यानाची हद्द निश्चित करून हद्दीवरील नागरिकांचे प्राधान्याने पुनर्वसन करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान भवनात आयोजित बैठकीत दिले. उद्यानातील अतिक्रमणधारकांना पुनर्वसन होईपर्यंत मानवीय दृष्टिकोनातून मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. मुलुंड आणि ठाणे बाजूकडील अतिक्रमणधारकांनाही पुनर्वसनासाठी त्या बाजूकडील जागांचा शोध घेऊन नियोजन करावे, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

# कराटे सरावादरम्यान झालेल्या दुखापतीमुळे वाचला जीव

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



पुण्यातील बाणेर येथील मणिपाल हॉस्पिटलमधील कॅन्सर सर्जनांनी 10 वर्षांच्या मुलीच्या स्वादुपिंडातील दुर्मिळ गाठ यशस्वीरित्या काढून टाकली. या केससह भारतात स्वादुपिंडाच्या सॉलिड स्यूडोपापिलरी निओप्लाझम (एसपीएन) या आजाराने पीडत सर्वात कमी वयाच्या रूग्णाची नोंद झाली आहे. विशेष म्हणजे, या गाठीची शरीरात कोणतीही लक्षणे दिसत नव्हती. पण, शाळेत कराटेच्या तासादरम्यान पोटाला झालेल्या दुखापतीमुळे या आजाराचे अनपेक्षितपणे निदान झाले. इमेजिंग आणि बायोप्सीसह तपासण्या केल्यानंतर सॉलिड स्यूडोपापिलरी निओप्लाझम (एसपीएन)चे निदान झाले. हा स्वादुपिंडाचा दुर्मिळ आणि कमी तीव्रतेचा कर्करोगजन्य ट्यूमर आहे, जो पूर्णपणे काढून टाकल्यास रुग्ण पूर्णपणे बरा होण्याची शक्यता अत्यंत जास्त असते. एकूण स्वादुपिंडाच्या गाठींपैकी एसपीएनचे प्रमाण फक्त 1 ते 3 टक्के असते आणि दरवर्षी 10 लाख व्यक्तींपैकी एका व्यक्तीला हा आजार होतो. हा आजार प्रामुख्याने तरुण महिलांमध्ये, साधारणपणे किशोरवयीन ते 30 वर्षांच्या वयोगटात अधिक आढळतो, आणि लहान मुलांमध्ये या आजाराचे निदान होणे अत्यंत दुर्मिळ आहे. त्या मुलीमध्ये आजाराची कोणतीच लक्षणे दिसून येत नव्हती, तसेच ती नेहमीप्रमाणे शाळेत जात होती आणि दैनंदिन काम करत होती, ज्यामुळे या निदानामुळे तिच्या पालकांना मोठा धक्का बसला. शस्त्रक्रियेचा निर्णय घेण्यापूर्वी कुटुंबाने अनेक हॉस्पिटल्समध्ये डॉक्टरांचा सल्ला घेतला. या केसबाबत सांगताना बाणेरमधील मणिपाल हॉस्पिटलमधील सर्जिकल ऑन्कोलॉजीचे एचओडी व कन्सल्टण्ट डॉ. अमित पारसनीस म्हणाले , शस्त्रक्रियेदरम्यान स्वादुपिंडाच्या रचनेचे नीट निरीक्षण केल्यानंतर आम्ही सेंट्रल पॅनक्रिएटॉमी करण्याचा निर्णय घेतला. यामुळे आम्हाला ड्युओडेनम (लहान आतड्याचा सुरुवातीचा भाग) आणि स्वादुपिंडाचा काही भाग सुरक्षित राखता आला, तसेच व्हिपल प्रोसिजर सारखी मोठी व गुंतागुंतीची शस्त्रक्रिया टाळता आली.

# महिला दिनानिमित्त हिंगोलीत परिसंवाद व महिला कवी संमेलन उत्साहात!

**हिंगोली: (समर्थ गांवकरी)**




आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त मराठवाडा साहित्य परिषद शाखा हिंगोली व थवा प्रकाशन, हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने ८ मार्च रोजी हिंगोली येथील जगदंब कॅफे येथे महिलांचे कवी संमेलन व परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. दोन सत्रांत पार पडलेल्या या कार्यक्रमाला साहित्यप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात 'नोकरी करणाऱ्या स्त्रिया व त्यांच्या पुढील आव्हाने' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. या सत्राच्या अध्यक्षस्थानी जिजाऊ ब्रिगेडच्या राज्य उपाध्यक्षा ज्योतीताई कोथळकर होत्या, तर प्रमुख पाहुण्या म्हणून प्राचार्या माधवीताई पाटील गोरेगावकर उपस्थित होत्या.

यावेळी प्रा. अंजली टापरे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, नोकरी करणाऱ्या स्त्रियांना घर आणि काम अशा दोन्ही आघाड्यांवर अनेक जबाबदाऱ्या सांभाळाव्या लागतात. कुटुंबातील जबाबदाऱ्या, सामाजिक अपेक्षा आणि कामाच्या ठिकाणचा ताणतणाव यांचा समतोल राखताना महिलांना मोठ्या आव्हानांना सामोरे जावे लागते. मात्र शिक्षण, आत्मविश्वास आणि परस्पर सहकार्याच्या बळावर स्त्रिया या सर्व अडचणींवर मात करून समाजात आपली स्वतंत्र ओळख निर्माण करत आहेत.

प्रमुख पाहुण्या माधवीताई पाटील गोरेगावकर यांनी महिलांनी आर्थिक व मानसिकदृष्ट्या सक्षम होणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. शिक्षण, स्वावलंबन आणि आत्मविश्वास यांच्या माध्यमातून महिलांनी समाजातील सर्व क्षेत्रांत आपले स्थान निर्माण केले आहे, असे त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय समारोपात ज्योतीताई कोथळकर यांनी सांगितले की, स्त्रियांना घरात आणि बाहेर अशा दोन्ही आघाड्यांवर संघर्ष करावा लागतो; परंतु याच संघर्षातून त्या अधिक सक्षम बनतात. आज शिक्षण, साहित्य, प्रशासन, उद्योग, सामाजिक कार्य आदी विविध क्षेत्रांत स्त्रिया उल्लेखनीय कामगिरी करत असून समाजाच्या प्रगतीत त्यांचा मोठा वाटा आहे.

यानंतर दुसऱ्या सत्रात महिलांचे कवी संमेलन रंगले. या कवी संमेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ हिंदी कवयित्री व गझलकारा सुमन दुबे 'स्वामिनी' होत्या, तर प्रमुख पाहुण्या म्हणून पारिजात देशमुख उपस्थित होत्या.

अध्यक्षीय मनोगतात सुमन दुबे 'स्वामिनी' यांनी आपल्या प्रभावी काव्यपंक्ती सादर करताना स्त्रीच्या संघर्षमय प्रवासाचे चित्रण केले—

"हमने अपनी पहचान राख
से उठकर बनाई है,
यहाँ ना जीने की खुशी है,
ना मौत का खौफ है."

डॉ. राधिका माणिक देशमुख यांनी निसर्गरम्य प्रतिमा उभी करणाऱ्या ओळी सादर केल्या—

"भ्रमर फिरतो
भुलनिया रंगा
घालतोय पिंगा
पाण्यावर."

तसेच त्यांनी कवी व कथाकार गोडाती काळे यांच्या ओळी सादर केल्या—

"तिच्या तळहातावर
रेषा नाहीत फक्त,
तिथं पेरलेली आहेत
उद्याची पिकं
आणि उद्याची स्वप्नं...!"

प्रमुख पाहुण्या पारिजात देशमुख यांनी स्त्रीच्या अस्तित्वाचा वेध घेणाऱ्या ओळी सादर करताना—

"बाई होण्याची ही संज्ञा
चिकटली माथ्यावरी
जन्मजन्माचे हे कोडे
उमगेना मला तरी..."

अशा ओळींमधून स्त्रीच्या भावविश्वाला अभिव्यक्ती दिली. तसेच त्यांनी ज्येष्ठ कवी रतन आडे यांच्या ओळीही सादर केल्या.

डॉ. वसुंधरा नायक यांनी छंदकवी गणेश येवले यांच्या ओळी सादर केल्या, तर अश्विनी देशमुख यांनी प्रेरणादायी कविता सादर करताना—

"तुझे काही असले नसले तरी
तुझ्या पंखाएवढी भरारी ठेव
उंच गगनात नाव झळकेल तुझं
फक्त स्वतःवर विश्वास ठेव."

अशा ओळींमधून आत्मविश्वासाचा संदेश दिला.

प्रा. अंजली टापरे यांनी स्त्रीच्या अस्तित्वाच्या प्रश्नावर भाष्य करणारी कविता सादर केली. संगीता चौधरी यांनी हिंदीतील प्रभावी ओळी सादर करून स्त्रीच्या जिद्दीचा गौरव केला. विजया पतंगे यांनी प्रेमभावनेने नटलेली कविता सादर केली, तर रसिका विडोळकर यांनी नात्यातील अबोल्याचे भावस्पर्शी चित्र आपल्या कवितेतून उभे केले. डॉ. वंदना काबरा यांनी 'मिशन करिना' ही विनोदी कविता सादर करून उपस्थितांना खळखळून हसवले. दर्शना ओ. भुरे यांनी स्त्रीच्या दैनंदिन जीवनातील भावविश्व मांडले, तर रूपाली माळोदे यांनी आईच्या प्रेमाची महती आपल्या कवितेतून व्यक्त केली. गौरी गिरीष गुंडेवार यांनी निरोगी आयुष्याचा संदेश देणाऱ्या ओळी सादर केल्या, तर ज्ञानदा चौधरी यांनी बदलत्या समाजरचनेवर भाष्य करणारी कविता सादर केली. स्त्रीचे अस्तित्व, तिचा संघर्ष, प्रेम, कुटुंब, समाजातील बदलती नाती आणि स्त्री सक्षमीकरण अशा विविध विषयांवर सादर झालेल्या कवितांमुळे कवी संमेलन अत्यंत रंगतदार झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. राधिका देशमुख व पारिजात देशमुख यांनी केले, तर आभार प्रदर्शन अश्विनी देशमुख यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुमन दुबे, डॉ. राधिका देशमुख, पारिजात देशमुख, अश्विनी देशमुख, विजया पतंगे, अंजली राजुरकर, अनुराधा राजुरकर, संगीता चौधरी, रसिका विडोळकर, ज्ञानदा चौधरी आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# एआय जागतिक अर्थव्यवस्थेचे स्वरूप बदलणार

## डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर ठरवेल नेतृत्व" : जयकुमार रावल, मंत्री, महाराष्ट्र शासन



**पुणे : (समर्थ गांवकरी)**

भारताच्या डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चरविषयक महत्त्वाकांक्षांना CII Datacentre Blueprint Summit 2026 च्या 7व्या आवृत्तीत विशेष अधोरेखित करण्यात आले. या परिषदेत वरिष्ठ सरकारी नेते आणि उद्योग क्षेत्रातील दिग्गजांनी भारताला एआय-आधारित डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चरचे जागतिक केंद्र बनवण्यासाठी महत्त्वाकांक्षी रोडमॅप मांडला. चर्चेत कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), क्लाऊड तंत्रज्ञान आणि डिजिटल अर्थव्यवस्थेच्या वेगवान विस्तारामुळे निर्माण होणाऱ्या संधींवर भर देण्यात आला, तसेच डेटा सेंटर्स, शाश्वत ऊर्जा आणि उच्च-गती कनेक्टिव्हिटीमध्ये मोठ्या गुंतवणुकीची गरज अधोरेखित करण्यात आली.

मुख्य भाषणात महाराष्ट्राचे विपणन व प्रोटोकॉल, एफडीआय, डायस्पोरा व्यवहार आणि आऊटरीच मंत्री जयकुमार रावल यांनी एआय-आधारित जागतिक अर्थव्यवस्थेत डेटा सेंटर्सची धोरणात्मक भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, "एआय वेगाने जागतिक अर्थव्यवस्थेचे स्वरूप बदलत आहे आणि त्याला चालना देणारी पायाभूत सुविधा कोणते देश पुढे जातील हे ठरवेल. डेटा सेंटर्स हे डिजिटल युगातील कारखाने बनले आहेत—ते माहिती प्रक्रिया करतात, साठवतात आणि आधुनिक अर्थव्यवस्थेला चालना देणारी बुद्धिमत्ता सक्षम करतात. भारताची डिजिटल परिसंस्था वेगाने विस्तारत असताना आणि एआय, क्लाऊड कम्प्युटिंग व डिजिटल सेवांची मागणी वाढत असताना, जागतिक दर्जाचे डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर उभारणे अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे."

या चर्चेत डॉ. दीपेंद्र सिंह कुशवाह (IAS), विकास आयुक्त (उद्योग), महाराष्ट्र शासन यांनी तंत्रज्ञान क्षेत्राला चालना देण्यासाठी सातत्यपूर्ण धोरणात्मक पाठबळ आणि गुंतवणुकीचे महत्त्व अधोरेखित केले.

ते म्हणाले, "जागतिक गुंतवणुकीसाठी भारत एक महत्त्वाचे गंतव्यस्थान म्हणून उदयास येण्यामागे मजबूत धोरणात्मक चौकट, पायाभूत सुविधांचा विकास आणि वाढणारा कौशल्यसंपन्न मनुष्यबळ हा मोठा आधार आहे. डिजिटल परिवर्तन वेग घेत असताना तंत्रज्ञान पायाभूत सुविधा, डेटा सेंटर्स आणि कनेक्टिव्हिटीमध्ये सातत्यपूर्ण गुंतवणूक ही वाढ टिकवण्यासाठी आणि भारताचे जागतिक डिजिटल अर्थव्यवस्थेत स्थान मजबूत करण्यासाठी अत्यावश्यक ठरेल."

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांचे मुख्य सल्लागार कौस्तुभ धवसे यांनीही एआयच्या युगात डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चरचे वाढते महत्त्व अधोरेखित केले.

ते म्हणाले, "एआयच्या शतकात डेटा सेंटर्स हे अर्थव्यवस्थेला चालना देणारे शांत इंजिन असतील. एआय, क्लाऊड सेवा आणि डिजिटल प्लॅटफॉर्मची मागणी वाढत असताना, विस्तारक्षम, शाश्वत आणि सक्षम डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर उभारणे अत्यावश्यक आहे. या परिवर्तनासाठी आवश्यक परिसंस्था उभारण्यासाठी सरकार आणि उद्योग क्षेत्रातील मजबूत सहकार्य महत्त्वाचे ठरेल."

देशभरातील उदयोन्मुख डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर परिसंस्थेबाबत बोलताना आंध्र प्रदेश शासनाचे आयटी, इलेक्ट्रॉनिक्स आणि कम्युनिकेशन्स सचिव भास्कर कट्टमनेनी यांनी नव्या तंत्रज्ञान केंद्रांचा वेगाने होणारा विकास अधोरेखित केला.

# जेएसडब्ल्यू स्टील कोटेड प्रॉडक्ट्सला ट्रेडमार्क उल्लंघन प्रकरणात न्यायालयाचा मनाई हुकूम

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

जेएसडब्ल्यू स्टीलची पूर्ण मालकीची उपकंपनी आणि देशातील आघाडीच्या पोलाद उत्पादकांपैकी एक असलेल्या जेएसडब्ल्यू स्टील कोटेड प्रॉडक्ट्स लिमिटेडने आपल्या नोंदणीकृत ट्रेडमार्कचा अनधिकृत वापर करणाऱ्या कंपन्यांविरुद्ध माननीय मुंबई उच्च न्यायालयाच्या व्यावसायिक विभागाकडून दिनांक ५ फेब्रुवारी २०२६ रोजी एकतर्फी अंतरिम मनाई हुकूम मिळवला आहे. हा मनाई हुकूम रामलाल लखाजी देवासी (मेसर्स पार्वती स्टील ट्रेडर्स व मेसर्स चामुंडा स्टील), हितेश देवासी (मेसर्स पार्वती स्टील ट्रेडर्स) आणि बागदाराम लखारामजी देवासी (मेसर्स चामुंडा स्टील व आकाश स्टील पॉईंट) यांच्या विरोधात देण्यात आला आहे. संबंधित व्यापारी महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील लासलगाव



आणि मनमाड परिसरातून व्यवसाय करत असल्याचे समोर आले आहे. तपासात असे आढळून आले की प्रतिवादी जेएसडब्ल्यूच्या नोंदणीकृत 'कलरऑन+' आणि 'विश्वास+' या ब्रँडशी तंतोतंत जुळणारी किंवा फसव्या पद्धतीने साम्य असलेली चिन्हे वापरत होते. हे दोन्ही ब्रँड पोलाद उद्योगात व्यापक ओळख असलेले आहेत. जेएसडब्ल्यूने सादर केलेल्या प्राथमिक पुराव्यावर समाधान व्यक्त करत न्यायालयाने प्रतिवादींच्या परिसरात प्रवेश करून उल्लंघन करणारा माल, कागदपत्रे आणि साठा जप्त करण्याचे अधिकार देत न्यायालयीन रिसीव्हर नियुक्त करण्याचे आदेश दिले. या आदेशानुसार २८ फेब्रुवारी आणि १ मार्च २०२६ रोजी न्यायालयीन रिसीव्हरच्या पथकाने मेसर्स पार्वती स्टील ट्रेडर्स, मेसर्स चामुंडा स्टील आणि आकाश स्टील पॉईंट येथे यशस्वी कारवाई केली. या कारवाईदरम्यान मोठ्या प्रमाणात बनावट किंवा उल्लंघन करणारा माल जप्त करून सील करण्यात आला. या कारवाईपूर्वी जेएसडब्ल्यूने लासलगाव आणि मनमाड पोलीस ठाण्यांमध्ये फौजदारी तक्रारीही दाखल केल्या होत्या. त्यानंतर जानेवारी २०२५ मध्ये पोलिसांनी छापे टाकून बनावट माल जप्त केला होता. जेएसडब्ल्यू स्टील कोटेड प्रॉडक्ट्सने स्पष्ट केले की कंपनी आपल्या ट्रेडमार्क, लोगो आणि बौद्धिक संपदेच्या कोणत्याही अनधिकृत वापराचा तीव्र निषेध करते.

# प्युअरपॉवर वितरकाने कोठागुडेम येथे इलेक्ट्रिशियन आणि डीलर्ससाठी कार्यक्रम आयोजित केला



**पुणे : (समर्थ गांवकरी)**

प्रादेशिक ऊर्जा नेटवर्क मजबूत करण्यासाठी प्युअरपॉवर च्या वितरक नेक्स्ट जेन एंटरप्रायझेस यांनी हॉटेल थाटीपल्ली, कोठागुडेम येथे एक विशेष कार्यक्रम आयोजित केला. हा दोन सत्रांचा कार्यक्रम खम्मम आणि भद्राद्री कोठागुडेम येथील स्थानिक तांत्रिक आणि व्यावसायिक समुदायाला जोडण्यासाठी आयोजित करण्यात आला. अलीकडेच नेक्स्ट जेन एंटरप्रायझेस यांना प्रादेशिक वितरक भागीदार म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

कार्यक्रमाची सुरुवात स्थानिक इलेक्ट्रिशियनसाठी तांत्रिक सेमिनारने झाली. हे इलेक्ट्रिशियन या भागातील ऊर्जा इंस्टॉलेशनमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. या सत्रात प्युअरपॉवर ची प्रगत तंत्रज्ञान आणि एआयएस 156 टप्पा 2 सुरक्षा नियम महत्त्व समजावून सांगितले गेले.

सहभागींना स्मार्ट-ग्रिड तंत्रज्ञान आणि सोलर-फर्स्ट प्रणालीबद्दल माहिती देण्यात आली, जेणेकरून ते स्थानिक घरांमध्ये चांगली सेवा देऊ शकतील. यानंतर संध्याकाळी विशेष डीलर मीट आयोजित करण्यात आली. यात प्रमुख व्यावसायिक भागीदार आणि सहभागी उपस्थित होते. तेलंगणामध्ये वाढणाऱ्या नवीकरणीय ऊर्जा बाजाराबद्दल चर्चा करण्यात आली. प्युअरपॉवर चे "मेड इन इंडिया" हार्डवेअर ग्राहकांना ऊर्जा स्वावलंबन आणि कमी वीज खर्च मिळवून देऊ शकते, यावर भर देण्यात आला.



## iQOO Z11x भारतात लॉन्च

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

iQOO ने भारतीय बाजारात नवीन स्मार्टफोन iQOO Z11x लॉन्च केला आहे. विशेषतः कॉलेज विद्यार्थ्यांना लक्षात घेऊन तयार करण्यात आलेला हा स्मार्टफोन दमदार परफॉर्मन्स, मोठी बॅटरी आणि प्रगत एआय फीचर्ससह सादर करण्यात आला आहे. कंपनीच्या मते, हा आपल्या सेगमेंटमधील सर्वात वेगवान स्मार्टफोनपैकी एक असून तो MediaTek Dimensity 7400 Turbo प्रोसेसरवर चालतो. या प्रोसेसरला 1 मिलियनपेक्षा जास्त AnTuTu बेंचमार्क स्कोअर मिळतो, ज्यामुळे स्मूथ मल्टीटास्किंग आणि गेमिंगचा उत्तम अनुभव मिळतो.

# स्पर्धा परीक्षांच्या शहरांमध्ये 'हॅलो बच्चो'ची खास स्क्रीनिंग

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

नेटफ्लिक्सने 'हॅलो बच्चो'ही सीरीज़ भारतातील स्पर्धा परीक्षांसाठी ओळखल्या जाणाऱ्या प्रमुख शहरांमध्ये खास स्क्रीनिंगद्वारे दाखवली. यासाठी रीजेंट सिनेमा, पटना, व्हिक्टरी थिएटर, पुणे आणि सिटी मॉल फन सिनेमा, कोटा येथे विशेष स्क्रीनिंग दाखवण्यात आले. या सर्व ठिकाणी हाऊसफुल प्रेक्षकांसह उत्साहपूर्ण वातावरण पाहायला मिळाले. विद्यार्थ्यांच्या मेहनतीचा, स्वप्नांचा आणि संघर्ष साजरे करणारा हा एक खास अनुभव ठरला. पुण्यातील व्हिक्टरी थिएटर, येथे या स्क्रीनिंगला जबरदस्त प्रतिसाद मिळाला. येथे 490 विद्यार्थी आणि स्टाफ उपस्थित होते आणि संपूर्ण हॉल भरून गेला होता. भारतातील स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पुणे हे महत्त्वाचे शहर मानले जाते, त्यामुळे हा क्षण खास ठरला. तसेच कोटा,




ज्याला देशाची कोचिंग राजधानी म्हटले जाते, आणि पटना सारख्या मोठ्या विद्यार्थी केंद्रांमध्येही स्क्रीनिंगदरम्यान मोठ्या संख्येने विद्यार्थी, शिक्षक आणि कुटुंबीय उपस्थित होते. चित्रपट पाहताना अनेकांना त्यात स्वतःचा संघर्ष आणि स्वतःच्या स्वप्नांची झलक दिसली. स्क्रीनिंगदरम्यान सर्व ठिकाणी वातावरण उत्साहाने भरलेले होते, पण त्याचवेळी अनेक जण भावुकही झाले होते. अनेक ठिकाणी प्रेक्षकांनी स्वतःहून टाळ्या वाजवल्या आणि काहींच्या डोळ्यात पाणीही आले. पुणे येथील एका विद्यार्थ्याने सांगितले, "मी येथे या सीरीज़चे पहिले दोन एपिसोड पाहिले आणि ते खूप प्रेरणादायी वाटले. स्क्रीनवर जणू माझ्याच विद्यार्थी जीवनातील संघर्षाची कथा दाखवली जात आहे असे वाटले. या मालिकेत दाखवले आहे की विद्यार्थी शून्यापासून सुरुवात करून शिक्षणाच्या जोरावर आपली परिस्थिती बदलण्याचा प्रयत्न कसा करतात." विद्यार्थ्यांच्या या प्रतिक्रियेतून मालिकेत दाखवलेली जिद्द आणि संघर्षाची भावना स्पष्टपणे दिसून येते. तसेच पटना येथील एका विद्यार्थ्याने सांगितले, "या मालिकेच्या दोन एपिसोडमध्ये जे दाखवले आहे, त्याच टप्प्यातून मीही सध्या जात आहे. ही सीरीज़ खूप प्रेरणादायी आहे. आता मला अजून मेहनत करून अभ्यास करायचा आहे आणि इंडियन इंस्टिट्यूट ऑफ़ टेक्नोलॉजी मध्ये प्रवेश घ्यायचा आहे." यावरून ही कथा त्यांच्या आयुष्याशी किती जवळून जुळते हे दिसून येते. तर कोटा येथे NEET ची तयारी करणाऱ्या एका विद्यार्थिनीने सांगितले, "या सीरीज़चे दोन एपिसोड पाहताना असे वाटले की माझ्या आयुष्यातील काही क्षणच दाखवले जात आहेत. स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी म्हणून आम्ही या मालिकेतील अनेक प्रसंगांशी सहज जोडले गेलो.

# पार्डी येथे ५ शेतकर्याच्या केळीच्या बागा माथेफीरूंनी कोयत्यांने कापल्या : अज्ञाताविरूध्द गुन्हा दाखल

- १० लाखाच्या मालमतेचे नुकसान : ३२०० केळीचे झाडांची केली कतल तर १० हजार केळी बाधीत

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**




तालुक्यातील पार्डी(म) येथील ५ शेतकर्यांच्या १२ मार्चच्या रात्री अज्ञात माथेफिरूच्या गँगने निसवलेल्या केळींच्या बागेतील एकुण ३२०० केळींच्या झाडांची कोयत्याने कतल करून सबलाईनच्या सर्व पाईपांची तोडफोड केली,यामुळे या शेतकर्यांचे अतोनात नुकसान झाले,असुन तालुक्यात या घटनेमुळे एकच खळबळ उडाली असून, रिकामटेकड्यांनी व्देषापोटी केलेली ही घटना आहे हे समोर आली आहे,अर्धापूर पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे.

अर्धापूर तालुक्यातील पार्डी (म) येथील शेतकरी साईनाथ मारोतराव हापगुंडेगट क्र.१७९, प्रसाद साहेबराव हापगुंडे गट क्र. १७९,,नवनाथ दतराव हापगुंडे गट क्र १२, प्रफुल्ल बाबूराव देशमुख,,रवी कुमार हरीआप्पा पत्रे गट क्र. या ५ शेतकर्यांची १२ मार्च गुरूवारच्या रात्री अज्ञात माथेफिरूंच्या गँगने केळीच्या ३२०० केळीच्या झाडांची कोयत्याने कतल केली व १० हजार केळींचे झाडे उन्ह बागेत खुसल्याने बाधीत होणार असून तब्बल ३० लाख रूपयांच्या केळीचे नुकसान होणार आहे.यामुळे हे ५ शेतकरी पुन्हत: उध्वस्त झाले आहेत.या कुटुंबातील सर्व सदस्य दिवसभर रडत होती,केळीचे ३२०० झाडांची कतल करून करून या ५ शेतकर्यांच्या सबलाईन पाईप व तुषार पाईपचे काळे पाईप व ठिंबक सिंचन पाईप ही जागोजागी कापले आहेत,यापुर्वी पार्डीत सोयाबीन चे ढिग फुकून दिले होते,टिश्युचे केळीचे कंद उपटले होते, केळी व पपईची कतल केल्याच्या घटना घडल्या आहेत,तर कार व अॅटोच्या व कारच्या काचा अज्ञात दारू प्राशन करणारांनी फोडल्याच्या घटना घडल्या आहेत.

आखाड्यावरील पत्रे, केळीचे झाडे परभणीला विकल्याचे व हाळदीचे बेणे चोरल्याच्या घटना घडल्या असून, याप्रकरणी दोषी उघड झाले आहेत,विद्युत वायर चोरल्याच्या असंख्य घटना येथे घडल्या आहेत, केळींच्या झाडांची कतल प्रकरणी अर्धापूर पोलीसांनी अद्याप पंचनामा केला नाही.

## वीवो Y51 प्रो 5G लॉन्च

**पुणे : (समर्थ गांवकरी)**




वीवो इंडियाने आपल्या Y सिरीजमध्ये नवीन स्मार्टफोन वीवो Y51 प्रो 5G लॉन्च केला आहे. हा स्मार्टफोन अशा युजर्ससाठी डिझाइन करण्यात आला आहे जे स्मूथ आणि विश्वासार्ह परफॉर्मन्ससोबत इमर्सिव्ह एंटरटेनमेंटचा अनुभव घेऊ इच्छितात. हा फोन दैनंदिन वेगवान आणि बदलत्या जीवनशैलीशी जुळवून घेणारा अनुभव देतो. दीर्घकाळ टिकणारी परफॉर्मन्स, स्मूथ मल्टीटास्किंग आणि रोजच्या वापरासाठी सोयीस्कर अनुभव यावर विशेष लक्ष देत हा डिव्हाइस तयार करण्यात आला आहे. यामध्ये वीवोची अशी कल्पना दिसून येते की, प्रोडक्टिव्हिटी आणि एंटरटेनमेंट दोन्हींसाठी उपयोगी ठरणारे प्रॅक्टिकल इनोव्हेशन वापरकर्त्यांना देणे.

# राज्यस्तरीय अधिवेशनात शिवजन्मभूमी जुन्नरला दोन पुरस्कार

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

पुण्यनगरी नाशिक येथे नुकतेच दिनांक आठ व नऊ मार्च रोजी महाराष्ट्र राज्य जेष्ठ नागरिक महा संघातर्फे आणि नाशिक प्रादेशिक विभाग आयोजित ज्येष्ठ नागरिकांचे राज्यस्तरीय अधिवेशन पार पडले.या अधिवेशनाचे उद्‌घाटन जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांचे हस्ते झाले. अध्यक्षस्थानी फेस्कॉम चे अध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे होते. त्यानंतर दोन दिवस जेष्ठ नागरिकांसाठी आरोग्यविषयक माहिती पूर्ण कार्यक्रम तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले.शेवटी ज्येष्ठ नागरिकां साठी उत्कृष्ट काम करणाऱ्या संघांना तसेच महिला व पुरुषांना सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांचे हस्ते विविध पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.शिवजन्मभूमी जुन्नर येथील शिवनेरी जेष्ठ नागरिक संघास,राज्यस्तरीय "उत्कृष्ट जेष्ठ नागरिक संघ "हा पुरस्कार तसेच या संघाच्या सन्माननीय सदस्या





प्राध्यापिका मंगल एकनाथ डोंगरे यांना राज्यस्तरीय "उत्कृष्ट महिला जेष्ठ नागरिक "हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी जुन्नर तालुक्यामधून जुन्नर तालुका ज्येष्ठ नागरिक समन्वय समितीचे अध्यक्ष प्रा. एकनाथ डोंगरे मार्गदर्शक भिवाजी माळवे आणि सचिव नामदेव दिघे सल्लागार पांडुरंग मोडवे उपस्थित होते .त्याच बरोबर शिवनेरी जेष्ठ नागरिक संघ जुन्नर,ज्येष्ठ नागरिक संघ ओतुर,ज्येष्ठ नागरिक संघ नारायणगाव इत्यादी संघांचे संचालक बहुसंख्येने कार्यक्रमा स उपस्थित होते.

# जिल्हास्तरीय प्रदर्शनात कन्या विद्यालय प्रथम

**श्रीगोंदा: (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा येथील श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालयाने जिल्हास्तरीय अटल प्रदर्शनात प्रथम क्रमांक पटकावत आपल्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षकांसाठी "Empowering Teachers to Become ATL Transformation Agent" या उपक्रमांतर्गत गणित, विज्ञान व भाषा विषयांच्या शिक्षकांना सहा महिन्यांचे प्रशिक्षण देण्यात आले होते. या प्रशिक्षणामध्ये प्रत्येक विषयासाठी तीन दिवसांचे सत्र आयोजित करण्यात आले होते.




या उपक्रमाअंतर्गत १० मार्च रोजी अहिल्यानगर येथे जिल्हास्तरीय शिक्षक-विद्यार्थी अटल प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनातील मेकॅनिकल विभागात श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालय, श्रीगोंदा येथील श्रीमती गीतांजली राऊत-कदम यांनी तयार केलेल्या Self Watering System या उपकरणाला प्रथम क्रमांक मिळाला.

इयत्ता आठवीतील विद्यार्थिनी कु. मयुरी गांगर्डे हिने या प्रकल्पाचे उत्कृष्ट सादरीकरण केले. या प्रकल्पासाठी तिला श्रीमती गीतांजली राऊत-कदम यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

# घरगुती एलपीजी गॅस पुरवठा सुरळीत ठेवा – जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया

- घरगुती गॅस सिलिंडर हवे तर ई-केवायसी बंधनकारक, जिल्हा प्रशासनाचे निर्देश
- कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्यांवर कठोर कारवाई तर प्रामाणिक काम करणाऱ्यांना सर्वतोपरी सहकार्य

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



अहिल्यानगर जिल्ह्यातील गॅस वितरकांनी घरगुती एलपीजी गॅसचा पुरवठा अखंडित व सुरळीत ठेवावा. वितरणात विलंब, अनियमितता किंवा कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल तर प्रामाणिक काम करणाऱ्यांना सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल. नागरिकांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये यासाठी पारदर्शक व नियमानुसार वितरण करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्ह्यातील सर्व एलपीजी गॅस वितरकांच्या आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी जिल्हाधिकारी डॉ. आशिया बोलत होते. बैठकीस जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बडे, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी एम. के. चौधरी, बीपीसीएल कंपनीचे राजकुमार मिश्रा तसेच जिल्ह्यातील विविध गॅस एजन्सींचे वितरक उपस्थित होते.

गॅस बुकिंग मर्यादा व ओटीपी प्रणाली लागू - केंद्र शासनाच्या धोरणानुसार शहरी भागातील नागरिकांसाठी गॅस बुकिंगची मर्यादा २५ दिवस तर ग्रामीण भागासाठी ४५ दिवस निश्चित करण्यात आली आहे. गॅस सिलिंडरचे वितरण ग्राहकाच्या नोंदणीकृत मोबाईलवर पाठविलेल्या ओटीपीची पडताळणी झाल्यानंतरच करण्यात येणार असून ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे सर्व ग्राहकांनी आपली ई-केवायसी तत्काळ पूर्ण करून अधिकृत पद्धतीनेच गॅस घ्यावा तसेच अनावश्यक साठेबाजी करू नये व अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी नागरिकांना केले. एलपीजी गॅसचा साठा, वितरण व्यवस्था व सुरक्षेची खात्री करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व गॅस गोदामांची काटेकोर तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले असून त्यासाठी तालुकानिहाय विशेष पथके स्थापन करण्यात आली आहेत. पथकांनी आपल्या कार्यक्षेत्रातील गॅस गोदामांना प्रत्यक्ष भेट देऊन साठा नोंदी, सुरक्षितता उपाययोजना, वितरण प्रणाली तसेच नियमांचे पालन यांची सखोल पडताळणी करावी व अनियमितता आढळल्यास कायद्यानुसार कारवाई करावी, असे निर्देशही जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले. जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, जिल्ह्यात सध्या गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध असून नागरिकांनी घाबरून जाऊन अनावश्यक साठेबाजी करू नये. वितरकांनी बुकिंगच्या क्रमाने वेळेत गॅस वितरण करावे व ग्रामीण तसेच दुर्गम भागातही पुरवठा नियमित राहील याची विशेष काळजी घ्यावी. ग्राहकांना वेळेत सेवा मिळावी, वितरणात पारदर्शकता राखावी तसेच तक्रारींचे तत्काळ निवारण करावे, असेही त्यांनी सांगितले.

घरगुती गॅस सिलिंडरचा व्यावसायिक वापर होणार नाही यासाठी नियमित तपासणी करावी. अतिरिक्त दर आकारणी, बेकायदेशीर साठेबाजी किंवा काळाबाजार आढळल्यास संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल. जिल्हा प्रशासनाकडून एलपीजी गॅस पुरवठा व्यवस्थेवर सातत्याने लक्ष ठेवण्यात येणार आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले. बैठकीत गॅस सिलिंडरची उपलब्धता, साठा, बुकिंगनंतर वितरणाचा कालावधी, ग्रामीण व शहरी भागातील पुरवठा स्थिती तसेच वितरण व्यवस्थेतील अडचणींबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीस सर्व तहसीलदार व गट विकास अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.